सोमवार, २८ मार्च २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २४९
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

खालापूर टोल नाक्यावर ट्रेलरने कारचालकाला चिरडले/२
पांढऱ्या कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आणले पाणी/५
अलिबागचे तीन बॉडीबिल्डर करणार भारताचे प्रतिनिधित्व/६

## गोव्यात प्रमोद सावंत यांचा आज शपथविधी



**पणजी :** योगी आदित्यनाथ यांनी दोन दिवसांपूर्वी सलग दुसऱ्यांदा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आता गोव्यातही प्रमोद सावंत सोमवारी (दि. २८) मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अन्य बडे नेते उपस्थित राहणार आहेत. योगींप्रमाणेच सावंतही सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाचा कारभार स्वीकारणार आहेत. शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींशिवाय राष्ट्रीय स्तरावरील नेते तसेच भाजपशासित १० राज्यांचे मुख्यमंत्री गोव्यात येणार असल्याचे वृत्त आहे. गोव्यातील तालीगाव येथील श्यामा प्रसाद मुखर्जी स्टेडियममध्ये प्रमोद सावंत सरकारचा शपथविधी होईल. त्यासाठी भाजपकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे.

### शिवसेनेच्या यशवंत जाधवांच्या डायरीत संशयास्पद नोंदी

# ‘मातोश्री’ला दिल्या कोट्यवधींच्या भेटवस्तू

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष आणि शिवसेनेचे नेते यशवंत जाधव यांची चौकशी करणाऱ्या आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांना कोट्यवधी रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांची माहिती असलेली डायरी सापडली आहे. अधिकाऱ्यांना या डायरीत ५० लाख रुपयांचे घड्याळ आणि ‘मातोश्री’ला दोन कोटी रुपयांच्या आणखी भेटवस्तू दिलेल्या नोंदी आढळल्या आहेत.



शिवसेना नेते यशवंत जाधव हे मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष, तर त्यांच्या पत्नी यामिनी जाधव या भायखळा मतदारसंघाच्या आमदार आहेत. आयटी विभागाने २५ फेब्रुवारी रोजी घेतलेल्या झडतीदरम्यान यशवंत जाधव यांची डायरी जप्त करण्यात आली आहे. आयटी विभाग कंत्राटदार बिमल अग्रवाल यांच्या मालकीच्या न्यूजहॉक मल्टीमीडिया प्रा. लि. कंपनीच्या विविध व्यवहारांची चौकशी करीत आहे. जाधव यांनी बीएमसीच्या विविध ३० कोटींच्या कंत्राटांसाठी बिमल अग्रवाल यांची बाजू घेतल्याचा संशय आहे.

आयकर विभाग कोलकातामधील एका शेल कंपनीला दिलेल्या कर्जाच्या १५ कोटी रुपयांच्या परतफेडीचीही चौकशी करीत आहे. ही रक्कम बिमल अग्रवाल यांच्या कंपनीकडून जाधव यांच्या कंपनीला परत केली गेली होती. हे पैसे जाधव यांनी भाडेकरू असलेली आणि पगडी प्रणालीवर चालणारी हॉटेल व इमारत खरेदी करण्यासाठी वापरली, असे आयटी सूत्रांनी सांगितले. जाधव बीएमसीच्या स्थायी समितीचे अध्यक्ष असताना हे सर्व व्यवहार २०१८ ते २०२२दरम्यान झाले.

यशवंत जाधव यांनी न्यूजहॉक मल्टीमीडिया प्रा. लि.च्या माध्यमातून भायखळा येथील बिलाखडी चेंबर्समध्ये ३१ फ्लॅट खरेदी केल्याचाही आरोप आहे. जाधव यांनी इमारतीच्या चार ते पाच भाडेकरूंना रोख रक्कम दिली आणि अमेरिका आणि कॅनडामधील दोन भाडेकरूंच्या बाबतीत ही रक्कम हवालाद्वारे हस्तांतरित करण्यात आली. जाधव यांनी जमीन मालकाकडून

> **मुंबई महापालिकेचे स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्याकडे आयकर खात्याला कसली डायरी सापडली आणि त्यात कोणत्या मातोश्रीची नोंद आहे हे मला माहिती नाही, पण मला एवढेच दिसते आहे की चौकशीतून कोणीही सुटू शकत नाही आणि खूप काही होणार आहे.**
>
> **–चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष**

बिलाखडी चेंबर्सची मालकी खरेदी करण्यासाठी चार कोटी रुपये दिले, असे सूत्रांनी सांगितले.

बिमल अग्रवाल यांना काही वर्षांपूर्वी केंद्रीय अन्वेषण विभागाने आणि नंतर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली होती. अग्रवाल २०१८मध्ये तिहार तुरुंगातून जामिनावर बाहेर आला आणि जाधव यांच्यासोबत काम करू लागला.

गेल्या वर्षी आयटी विभागाने यामिनी जाधवांबद्दल स्वतंत्र तपासणी केली होती, ज्यामध्ये जाधव दाम्पत्याने कोलकातामधील शेल कंपनी प्रधान डीलर्स प्रा. लि.मार्फत १५ कोटी रुपयांची अवैध रक्कम वैध करून घेतली होती. जाधव यांच्याशी संबंधित आणखी काही प्रकरणांचा तपास सुरू आहे.

गेल्या महिन्यात आयटी अधिकाऱ्यांनी माझगावमधील बिलाखडी चेंबर्समधील जाधव यांचे निवासस्थान, त्यांचे व्यावसायिक सहकारी बिमल अग्रवाल यांचे घर आणि बीएमसीच्या पाच खासगी कंत्राटदारांच्या जागेसह ३६ परिसरांची झडती घेतली. यामध्ये आयटीला १३० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या किमान ३६ मालमत्तांचे तपशील सापडले आणि दोन कोटी रुपयांची अज्ञात रोख आणि दीड कोटी रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, यशवंत जाधव यांनी डायरीतील नोंदींमध्ये ‘मातोश्री’ हा आपल्या आईचा उल्लेख असल्याचे म्हटले आहे. डायरीतील पहिली नोंद आईच्या वाढदिवसानिमित्त घड्याळ वाटपाची आणि दुसरी नोंद गुढीपाडव्याला आईच्या स्मरणार्थ गरजूंना भेटवस्तू वाटपाची होती, असे स्पष्टीकरण जाधवांनी दिले. त्याची खुमासदार चर्चा आहे.

### आम्ही जे म्हटले ते खरे ठरतेय –फडणवीस



शिवसेना नेते आणि मुंबई महापालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या प्रकरणावर माजी मुख्यमंत्री आणि विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. नागपूरमध्ये बोलताना फडणवीस म्हणाले की, त्यांनी सभागृहातच सांगितले की २४ महिन्यांत ३८ मालमत्ता खरेदी केल्या आहेत. दोन वर्षे कोविड होता, पण कोविडच्या नावावर मुंबई महापालिकेला कसे लुटले जातेय हा आरोप आम्ही केला होता. आम्ही जे म्हटले होते ते आता खरे ठरत आहे.

# भारतीय वस्तूंना वाढती मागणी

### ■ पंतप्रधान नरेंद्र मोदींची ‘मन की बात’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २७) मन की बात कार्यक्रमाद्वारे देशवासीयांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी भारताने ४०० अब्ज डॉलर्सचे निर्यातीचे ध्येय गाठले आहे. हे भारताच्या क्षमतेला दर्शवते. याचाच अर्थ जगभरात भारतीय वस्तूंची मागणी वाढत आहे, असे सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, एकेकाळी भारतातून निर्यातीचा आकडा १०० अब्ज, कधी १५० अब्ज होता. आज भारत ४०० अब्ज डॉलरवर पोहचला आहे. भारतात तयार उत्पादनांची मागणी जगभरात वाढत आहे असा याचा अर्थ आहे. दुसरे म्हणजे भारताची पुरवठा साखळी दिवसेंदिवस मजबूत होत आहे. पूर्वी असे मानले जात होते की केवळ मोठे लोकच सरकारला उत्पादने विकू शकतात, परंतु सरकारी ई-मार्केटप्लेस पोर्टलने हे चित्र बदलले आहे. त्यातून नव्या भारताची भावना दिसून येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जाणार आहे, असे सांगून पंतप्रधान मोदींनी म्हटले की, आज संपूर्ण जगात योग आणि आयुर्वेदाप्रती कल वाढत आहे. गेल्या आठवड्यात कतारमध्ये आयोजित एका योग कार्यक्रमात ११४ देशांच्या नागरिकांनी भाग घेत एक जागतिक विक्रम स्थापन केला. आयुष उद्योगाची बाजारपेठ सतत विस्तारत आहे. सहा वर्षांपूर्वी आयुर्वेदाशी संबंधित औषधांची बाजारपेठ २२ हजार कोटींच्या आसपास होती. आज आयुष उत्पादन उद्योग सुमारे एक लाख ४० हजार कोटी रुपयांवर पोहचला आहे.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपल्या देशातील प्रत्येक जिल्ह्यात किमान ७५ अमृत सरोवर बांधले जाऊ शकतात. काही जुन्या तलावांमध्ये सुधारणा केली जाऊ शकते, तर काही नवीन बांधले जाऊ शकतात. या दिशेने तुम्ही नक्कीच काही प्रयत्न कराल याची मला खात्री आहे, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

या वेळी पंतप्रधान मोदींनी जलसंधारणावर भर दिला. मी अशा राज्यातून आलो आहे जिथे नेहमीच पाण्याची टंचाई असते. गुजरातमध्ये या विहिरींना वाव म्हणतात. गुजरातसारख्या राज्यात वावने मोठी भूमिका बजावली आहे. या विहिरी संरक्षणासाठी जल मंदिर योजनेने मोठी भूमिका बजावली आहे. संपूर्ण गुजरातमध्ये अनेक विहिरींचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यामुळे या भागातील पाणीपातळी वाढण्यासही मोठी मदत झाली. तुम्ही स्थानिक पातळीवरही अशाच प्रकारच्या मोहिमा राबवू शकता, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## नाशिकच्या चंद्रकिशोर पाटीलांसह उस्मानाबादेतील हातमाग वस्तूंचे कौतुक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘मन की बात’मध्ये बोलताना महाराष्ट्रातील नाशिकच्या चंद्रकिशोर पाटील यांच्या स्वच्छतेच्या कामाची दखल घेत कौतुक केले. चंद्रकिशोर पाटील गोदावरी नदीच्या काठावर उभे राहून लोकांनी नदीत कचरा टाकू नये म्हणून प्रयत्न करतात. यासाठी ते दिवसभरातील खूप वेळ खर्च करतात, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले तसेच उस्मानाबादच्या हातमाग वस्तूंचा उल्लेख करीत या वस्तू परदेशात निर्यात होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## निवडक

### अमरावतीत भीषण अपघात; पाच जणांचा जागीच मृत्यू

**अमरावती** : येथील कठोरा-रहाटगाव मार्गावर ट्रक आणि तवेरा कार यांची धडक होऊन पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन पुरुष, एक महिला आणि एका लहान मुलीसह आणखी एकाचा समावेश आहे. मृत व्यक्ती एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातात पाच जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### दोन वर्षांनंतर ३० जूनपासून सुरू होणार अमरनाथ यात्रा

**श्रीनगर** : कोरोना महामारीमुळे खंड पडलेली अमरनाथ यात्रा यंदा ३० जूनपासून पुन्हा सुरू होणार आहे. जम्मू-काश्मीरच्या उपराज्यपाल कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार परंपरेप्रमाणे ही यात्रा रक्षाबंधनाच्या दिवसापर्यंत म्हणजेच ११ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. या वर्षी अमरनाथ यात्रा ४३ दिवस असणार आहे.

# पाण्याची टाकी स्वच्छ करण्यासाठी उतरलेल्या दोन कामगारांचा मृत्यू

### ठाण्यातील घटना; अन्य दोघे रुग्णालयात दाखल

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यातील नौपाडा येथील हरिनिवास चौक भागात एका इमारतीची पाण्याची टाकी स्वच्छ करण्यासाठी आत उतरलेल्या दोन कामगारांचा रासायनिक द्रव्यामुळे गुदमरून मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २७) घडली. विवेक कुमार (३०) आणि योगेश नरवनकर (३८) अशी मृतांची नावे असून अन्य दोन कामगारांवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हरिनिवास चौक येथे एका संस्थेची इमारत आहे. या संस्थेने इमारतीच्या छतावरील पाण्याची टाकी स्वच्छ करण्याचे कंत्राट एका कंपनीला दिले होते. या कंपनीत विवेक कुमार, योगेश नरवनकर, गणेश नरवनकर आणि मिथुन ओझा हे काम करतात. रविवारी दुपारी हे चौघे पाण्याच्या टाकीत उतरले होते. टाकी स्वच्छ करण्यासाठी त्यांनी आत एक रासायनिक द्रव्य सोडले. या रासायनिक द्रव्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला होता.

घटनेची माहिती संस्थेच्या सभासदांनी नौपाडा पोलिसांना दिल्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांच्या पथकाने आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दलाच्या जवानांच्या मदतीने चारही कामगारांना बाहेर काढले, मात्र यातील विवेक आणि योगेश या दोघांचाही मृत्यू झालेला होता, तर गणेश आणि मिथुन या दोघांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### पोलिसांनाही जाणवला त्रास

बचावकार्यानंतर काही पोलिसांनाही उलट्या आणि डोकेदुखीचा त्रास जाणवला. वरिष्ठ निरीक्षक संजय धुमाळ यांनी ही माहिती दिली.

# फ्रान्सच्या परिवहनमंत्र्यांची जेएनपीएला भेट

### ■ भारत-फ्रान्सदरम्यान बंदर व्यापार संबंध होणार मजबूत

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

फ्रान्सचे परिवहनमंत्री जॉन बातिस्ते जेब्बारी यांनी रविवारी (दि. २७) जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) या भारतातील प्रमुख कंटेनर बंदरास भेट दिली. या भेटीमुळे भारत-फ्रान्स यांच्यातील जमीन, हवाई आणि सागरी वाहतूक व बंदर व्यापार संबंध अधिक मजबूत होणार आहेत.

आपल्या भेटीदरम्यान फ्रान्सच्या परिवहनमंत्र्यांनी ब्ल्यू इकॉनॉमीच्या संयुक्त मास्टर प्लॅनची अंमलबजावणी करून भारतीय बंदरे आणि लॉजिस्टिक व्हॅल्यू चेन विकसित करण्यासाठी फ्रेंच कंपन्या देत असलेल्या योगदानावर चर्चा केली.




जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी फ्रान्सचे परिवहनमंत्री जॉन बातिस्ते जेब्बारी व इतर फ्रेंच प्रतिनिधींचे पारंपरिक स्वागत केले. त्यांच्याशी संवाद साधताना श्री. वाघ म्हणाले की, जेएनपीए पायाभूत सुविधा व सागरी वाहतूक सुविधा विकसित करताना शाश्वत उपायांवर भर देते व प्रोत्साहन देते, ज्यामुळे सामाजिक आणि आर्थिक कार्यामध्ये अर्थपूर्ण सहभाग सक्षम होतो. जेएनपीएने विविध मल्टी-मॉडल सुविधा आणि प्रकल्प विकसित केले आहेत, ज्याचा आमच्या ग्राहकांना आणि भागधारकांना लाभ होत आहे.

भारत-फ्रेंच संबंधांबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले, भारत व फ्रान्स या दोन्ही देशांचा सागरी व बंदर क्षेत्रातील प्रगतीशील उत्कर्षामध्ये रस असून दोन्ही देश व्यापारी भागीदार आहेत. जेएनपीए प्राधिकरणाने फ्रान्सच्या प्रतिनिधी मंडळासमोर सादरीकरणाद्वारे विविध प्रकल्पांची माहिती दिली. प्रतिनिधी मंडळाने प्रत्यक्ष बंदर क्षेत्राचा दौरा केला व बंदरातील एकूण कामकाज आणि बंदरातील अद्ययावत विकासकामांची व सुविधांची माहिती घेतली. आपल्या भेटीदरम्यान फ्रान्सचे परिवहनमंत्री जॉन बातिस्ते जेब्बारी यांनी जेएनपीएच्या हरित बंदर उपक्रमांची व शाश्वत विकासाच्या दिशेने केल्या जात असलेल्या उपायांची प्रशंसा केली.

# रायगडातील पर्यटनस्थळे हाऊसफुल्ल!

### समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू पाहण्यास पसंती

**पाली : प्रतिनिधी**

कोकणातील मुंबई आणि पुण्याजवळचा जिल्हा असलेल्या रायगडातील निसर्गरम्य व मनमोहक स्थळांना सध्या पर्यटक मोठी पसंती देत आहेत. त्यामुळे सागरी किनारे व अन्य पर्यटनस्थळे गजबजली आहेत.

शनिवार व रविवार सलग लागून आलेल्या सुट्यांमध्ये पर्यटक एन्जॉय करण्यासाठी बाहेर पडतात. रायगड जिल्ह्यात समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, तीर्थक्षेत्र असे बरेच काही आहे. ते पाहण्यासाठी पर्यटकांचा ओघ वाढत आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व लॉज व्यावसायिक, खानावळी, दुकानदार यांचीही चलती आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

अष्टविनायकांपैकी दोन गणपती रायगडात आहेत. ते म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर. सध्या येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याला शिवप्रेमींची नेहमीच पसंती असते. मुरूड आणि अलिबाग समुद्रकिनाऱ्यांची मजा लूटतानाच पर्यटक येथे असलेल्या जंजिरा आणि कुलाबा किल्ल्यालाही आवर्जून भेट देतात आणि तिथला इतिहास जाणून घेतात. ओहटीच्या वेळी कुलाबा किल्ल्यावर चालत किंवा घोडागाडीने जाता येते, तर भरतीच्या वेळी किल्ल्यावर जाण्यासाठी मोटारबोटची व्यवस्था आहे. जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठीही फेरीबोट असते.

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वरला पर्यटकांसह भाविकांचीही पसंती असते, कारण एकाच ठिकाणी भव्यसमुद्र किनारा आणि देवदर्शन अशा दोन्ही गोष्टींचा सुरेख संगम तेथे साधता येतो. महाराष्ट्र पर्यटन विभागाने (एमटीडीसी) येथे पर्यटकांसाठी राहण्याची सोय केली आहे तसेच खाजगी लॉजसुद्धा उपलब्ध आहेत. तेथूनच दिवेआगर आणि श्रीवर्धन या समुद्रकिनाऱ्यांवर जाता येते.

उरणजवळील घारापुरी बेटावर लेणी पाहण्यासाठीसुद्धा कलाप्रेमींची गर्दी होत आहे. येथे जाण्यासाठी उरण आणि गेटवे ऑफ इंडियावरून फेरीबोट सेवा उपलब्ध आहे. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळाला आहे.

### बीचकडे अधिक ओढा

रायगड जिल्ह्याला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. यामध्ये अलिबाग, नागाव, वरसोली, मुरूड, काशिद, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर येथील किनारे पर्यटकांना भुरळ घालतात. वाढत्या उष्म्यामुळे समुद्रात मनसोक्त डुंबण्याचा आनंद पर्यटक लुटत आहेत. अनेक किनाऱ्यांवर पर्यटक बोटिंग, घोडागाडी, बाईक राईडची मजाही घेत आहेत. त्याचप्रमाणे ताजी मासळी आणि हापूस आंबे खाण्यावर ताव मारत आहेत. समुद्रकिनाऱ्यांव्यतिरिक्त जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले थंड हवेचे ठिकाण माथेरान पर्यटकांनी बहरले आहे. सर्वसामान्य दिवसांपेक्षा वीकेण्डला येथे अधिक गर्दी दिसते.

### खालापुरात भव्य सामुदायिक विवाह सोहळा

## ७० जोडप्यांचे शुभमंगल सावधान!



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र आणि केप्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २७) खालापूर तालुक्यातील वाशिवली वाडी साई नगर येथे जनजाती समाजातील ७५ जोडप्यांचा भव्य सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात झाला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्री ग्लोबल कॅपिटल लि.चे विश्वस्त बेनी प्रसाद राऊका, सीएसआर नीता जोशी, राहूल रसाळ, वनवासी कल्याण आश्रमाच्या कोकण प्रांत अध्यक्ष ठमाताई पवार, कल्याण प्रांत उपाध्यक्ष सोनू म्हसे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी वधू-वरांना आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.

# चौकशीतून कोणीही सुटणार नाही!

## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा इशारा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेचे स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्याकडे आयकर खात्याला कसली डायरी सापडली आणि त्यात कोणत्या मातोश्रींची नोंद आहे, हे मला माहिती नाही. पण मला एवढेच दिसते आहे की, चौकशीतून कोणीही सुटू शकत नाही आणि खूप काही होणार आहे, असे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी रविवारी कोल्हापूर येथे सांगितले.

ते म्हणाले की, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काहीही आरोप केले तरी केंद्रीय तपासी यंत्रणा स्वायत्त आहेत ही वस्तूस्थिती आहे. या यंत्रणांच्या तपासाची आपल्याला काही माहिती नाही. त्यामुळे इन्कम टॅक्स विभागाला यशवंत जाधव यांच्याकडे कसली डायरी सापडली हेसुद्धा माहिती नाही. मात्र एवढी खात्री आहे की, या चौकशीतून कोणीही सुटू शकणार नाही. खूप काही होणार आहे, हेसुद्धा दिसते आहे. मातोश्रीचा उल्लेख असलेल्या डायरीची ईडीकडून चौकशी व्हायला हवी या भाजप आमदार अतुल भातखळकर यांच्या मागणीचे प्रदेशाध्यक्षांनी समर्थन केले.

ते म्हणाले की, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने उभारलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मारकाच्या उद्घाटनाला केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना निमंत्रित करणे योग्य नाही. या महानगरपालिकेत भाजपची सत्ता आहे. महानगरपालिकेने बांधलेल्या स्मारकाचे उद्घाटन करण्यास विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनाही निमंत्रित करायला हवे. त्यामुळे भाजपा आ. गोपीचंद पडळकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी केवळ पवारांच्या हस्ते उद्घाटन करण्यास जो विरोध केला आहे तो योग्यच आहे. त्यांनी सांगितले की, सांगलीत भाजप कार्यकर्त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी पक्षपातीपणे निर्बंध लावले आहेत. शरद पवारांच्या हस्ते उद्घाटन व्हावे यासाठी त्यांच्या कार्यक्रमाच्या आधीपर्यंतच निर्बंध लावले आहेत. हा पोलीस यंत्रणेचा दुरुपयोग आहे. कोल्हापूरमध्येही असे प्रकार चालू आहेत. आठ-आठ वर्षांपूर्वीच्या केसेस काढून कार्यकर्त्यांना पोलीस ठाण्यात बसवून ठेवले जात आहे. आपला पोलिसांना इशारा आहे की, त्यांनी पक्षपात बंद करावा. हे फार दिवस चालणार नाही. आम्ही पोलीस ठाण्याला घेराव घालू.



माजी खासदार किरीट सोमय्या हे भ्रष्टाचाराचे कर्दनकाळ ठरले आहेत. त्यांच्या भीतीने महाविकास आघाडीचे मंत्री आरोप करीत आहेत. भारतीय जनता पक्ष पूर्णपणे किरीट सोमय्या यांच्या पाठीशी आहे, असेही ते म्हणाले.

**मतदारांचा भाजपवर विश्वास**

कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचारासाठी येण्यास भाजपचे राज्यभरातील नेते, कार्यकर्ते उत्सुक आहेत. भाजप या मतदारसंघात मतदारांशी थेट संपर्क साधेल आणि विक्रमी मतांनी निवडणूक जिंकेल, असे ते म्हणाले.

**राऊतांबाबत बोलणे बंद!**

संजय राऊत यांनी केलेल्या टीकेबाबत चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. आपण सामना वृत्तपत्र वाचणे आणि संजय राऊत यांच्याबद्दल बोलणे बंद केले आहे, असे ते या वेळी म्हणाले.

# वढाव-बोर्झे खारभूमी योजनेला लवकरच नवीन ठेकेदार; तहसीलदारांचे आश्वासन

**पेण : प्रतिनिधी**

पाच वर्षांपासून रखडलेल्या वढाव-बोर्झे खारभूमी योजनेच्या कामासाठी नवीन ठेकेदार निवडण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू झाली आहे. या योजनेसाठी एप्रिलमध्ये नवीन ठेकेदार नेमण्यात येईल असे आश्वासन पेण तहसीलदारांनी दिल्याने मोठे वढाव ग्रामस्थांच्या मागणीला यश आले आहे.

वढाव-बोर्झे खारभूमी योजना नादुरुस्त झाल्याने खारे पाणी शेतात शिरून वारंवार शेतीचे नुकसान होत होते. या योजनेचे नूतनीकरण व्हावे, यासाठी मोठे वढाव ग्रामस्थांच्या मागणीनुसार शासनाच्या खारभूमी विकास विभागाकडून या योजनेच्या नूतनीकरणाकरीता चार कोटी सात लाख एवढा निधी २०१८ साली मंजूर झाला आहे. मात्र गेल्या चार वर्षांत ठेकेदाराला दोन वेळा मुदतवाढ देऊनही हे काम ठेकेदाराला पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे बांध फुटून भातशेतीत खारे पाणी शिरून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. वढाव ग्रामस्थांनी वारंवार खारभूमी विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र पेण येथील खारभूमी विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे लक्ष न दिल्याने वढाव-बोर्झे, खारभूमी विकास योजनेच्या पाच किमी बांधाच्या पुनर्बांधणी योजनेत झालेला विलंबविरोधात संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी बेमुदत उपोषण करण्याची रितसर नोटीस दिली होती. याच अनुषंगाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी पेण तहसीलदारांशी केलेल्या चर्चेतून मार्ग काढत या खारभूमी विकास योजनेच्या कामाला गती देण्याचे निर्देश दिले आहेत.

# दहिगाव बौद्धवाडीत भीषण पाणीटंचाई

## आमरण उपोषणाचा इशारा; बीडीओंना निवेदन



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील दहिगाव बौद्धवाडी येथे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी तालुका वंचित बहुजन आघाडीतर्फे गटविकास अधिकारी विजय यादव यांना निवेदन देण्यात आले आहे. काही दिवसांत येथील पाणी प्रश्न सुटला नाही, तर ७ एप्रिलला ग्रामस्थांसह रिकामे हंडे घेऊन पंचायत समिती दालनासमोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीतर्फे निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की, दहिगाव बौद्धवाडी येथील ग्रामस्थ मागील दोन वर्षांपासून पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क करीत आहेत, मात्र ग्रामपंचायत ग्रामस्थांच्या पाणी प्रश्नावर गांभीर्याने विचार न करता केवळ उडवाउडवीची उत्तरे देत आहे. त्यामुळे या ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल होत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांवर विकत पाणी आणायची वेळ आली आहे.

शासनाने १५ वित्त आयोगातून पाणीपुरवठाकरीता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केलेला असतांना केवळ हा समाज बौद्ध व मागास असल्याने त्यांची पाणीपुरवठा योजना लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी केला.

गटविकास अधिकारी विजय यादव यांना निवेदन देतेवेळी वंचित बहुजन आघाडी सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड महासचिव आनंद जाधव, युवा अध्यक्ष राहुल गायकवाड, युवा महासचिव प्रशांत गायकवाड, मयूर गायकवाड, अनिकेत लोखंडे यांसह नेते मंगेश वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

> **येथील पाणीप्रश्न लवकरच सोडवला जाईल. येथील पाणीपुरवठा योजनेसाठी अधिक निधी आणण्यासाठी प्रयत्न करू.**
> **-विजय यादव, गटविकास अधिकारी, पाली-सुधागड**

# सिद्धिविनायक मंदिर समितीचा प्रश्न चिघळणार





## आगरी समाजाचा आंदोलनाचा एल्गार

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर हे आगरी समाजाच्या देऊबाई पाटील यांनी १८०१ साली बांधलेले असताना या मंदिराच्या व्यवस्थापन समितीवर याच आगरी समाजाला डावलून परस्पर परप्रांतीयांना स्थान दिले जात आहे. याविरोधात आता आगरी समाज कमालीचा आक्रमक झाला आहे. शुक्रवारी (दि. २५) मुंबईतील शिवडी येथील आगरी समाज मंदिराच्या सभागृहात झालेल्या समाज बांधवांच्या सभेत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या ४०-४२ वर्षांपासून सर्व समाज घटकांना व्यवस्थापन समितीमध्ये प्रतिनिधित्व देण्यात आले आहे, परंतु एकट्या आगरी समाजाला डावलले गेले आहे. याबद्दल समाजामध्ये प्रचंड नाराजी आहे. यापुढे असे घडू देणार नाही असा ठाम निर्धार या सभेत करण्यात आला. अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेने यासंदर्भातल्या जनभावना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना १४ डिसेंबर २०२० रोजीच्या पत्राद्वारे कळविल्या होत्या, पण त्याची कसलीही दखल न घेता २२ जानेवारी २०२१ रोजी नवी व्यवस्थापन समिती नियुक्त केली, मात्र त्यावर समाजाचा एकही प्रतिनिधी न घेता उलट २९ सप्टेंबर २०२१ रोजी राज्य सरकारने ही व्यवस्थापन समिती तीन वर्षांसाठी नियुक्त केल्याचे कळविले आहे, पण ही मुदत संपल्यानंतरच्या नियुक्तीमध्ये आगरी समाजाला प्रतिनिधित्व देणार असल्याचेही आश्वासन दिलेले नाही. यामुळे समाजात नाराजी पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर शिवडी-मुंबई येथे झालेल्या सभेत मुंबईचे नागरिक, मूळनिवासी असलेल्या आगरी समाजाला दुर्लक्षित करणाऱ्या, त्याला सापत्न वागणूक देणाऱ्या राज्यकर्त्यांच्या पक्षपाती भूमिकेवर कडाडून टीका करण्यात आली.

समाजाचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला उपाध्यक्ष गजानन म्हात्रे, मुंबईचे माजी नगरसेवक रघुनाथ थवई, डॉ. सिद्धार्थ पाटील, प्रवीणचंद्र पाटील, सचिव मंगेश कडू, निवृत्त पोलीस निरीक्षक गोपी पाटील, अलिबाग शाखाध्यक्ष राजेंद्र वाघ, सुभाष गावंड, चंद्रशेखर म्हात्रे, शाम पाटील, कृष्णा घोगरे, अशोक म्हात्रे, विनोद देवळे, गजानन भोईर, गणेश म्हात्रे, विधाता ठाकूर, धुरंधर मढवी, जयेश म्हात्रे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भाजप पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील यांची कन्या आकांक्षा हिच्या वाढदिवसानिमित कोंडले खैरवाडीतील ईमयानू अल मरसी होम आश्रमात मुलांना बिस्किट व पेनवाटप करण्यात आले. या वेळी अध्यक्ष फादर सिनू मैथ्यू, मलिका सिनू मैथ्यू, भावेश पाटील उपस्थित होते.

# नवी मुंबई पालिकेच्या स्वच्छता अभियानाला तुर्भेमध्ये हरताळ

### रात्रीच्या वेळी कचरा टाकला जातो रस्त्यावर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शहरात स्वच्छतेसाठी प्रयत्न केले जात आहेत. मात्र तुर्भे कॉलनीतील काही रहिवाशांनी या अभियानाला हरताळ फासले आहे.

महापालिकेच्या वतीने घंटागाडी तुर्भे गावात सकाळ आणि संध्याकाळ या दोन सत्रात कचरा घरोघरी जाऊन संकलन करते. तरीही काही नागरिक रात्रीच्या वेळी कचरा रस्त्याच्या कडेला टाकत आहेत. महापालिकेतर्फे ठोस कारवाई होत नसल्याने या नागरिकांचे फावले असल्याचा आरोप होत आहे.

महापालिकेने तुर्भे आयसीएल शाळा येथे सायकल मार्ग बनवला आहे. शाळेच्या मैदानालगतची कचराकुंडी हटवली आहे. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी या कचरा कुंडीच्या समोर सायकल मार्गावर लोखंडी मांडणी ठेवली आहे. असे असले तरी तुर्भे परिसरातील काही रहिवाशी कचराकुंडी काढलेल्या ठिकाणी रात्री कचरा टाकत आहे.

कचरा उघड्यावर पडल्याने कुत्री आणि आणि अन्य जनावरे खाद्य शोधतात, त्यामुळे सगळा कचरा सायकल मार्गावर येत आहे. परिणामी या परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे. रोगराई पसरण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे जागरूक नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून याला पायबंद घालावा, अशी मागणी महापालिकेकडे केली आहे.

**दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याची शक्यता**

या ठिकाणी २ शाळा आहेत. त्यामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. कचऱ्यामुळे या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येऊन साथरोग पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# खालापूर टोल नाक्यावर ट्रेलरने कारचालकला चिरडले



**खोपोली : प्रतिनिधी**

फास्टटॅग चालत नाही म्हणून कारमधून खाली उतरलेल्या कारचालक मनोज रामतीरथ पाठक (रा. अंधेरी,) याच्या अंगावरून ट्रेलर गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना खालापूर टोल नाक्यावर घडली.

मनोज पाठक हा त्याची कार क्रमांक एमएच ०३ बीसी ९८६१ घेऊन द्रुतगती मार्गाने मुंबईकडे निघाला होता. शनिवारी (दि. २६) रात्री दोन वाजणेचे सुमारास खालापूर टोल नाका येथे फास्टटॅग यंत्रणा काम करीत नसल्याने तो कारमधून उतरला. लेन ओलांडून जात असताना भरधाव वेगात आलेल्या ट्रेलर क्रमांक एमएच ४६ एच २२२१ ने मनोज धडक दिली. या धडकेत मनोज ट्रेलरच्या टायरखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती टोल नाका अधिकारी धनराज सकपाळ यांनी खालापूर पोलीस ठाण्यात दिली.

बेदरकारपणे ट्रेलर चालवून अपघातास कारणीभूत ट्रेलर चालक सेराज अहमद अब्दुल वहिद याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# चोरी केली नसेल तर घाबरू नका!

## ■ सुजय विखे-पाटील यांचा 'मविआ'ला चिमटा

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय तपास यंत्रणांचा भाजपाकडून गैरवापर केला जात असल्याची टीका राज्यातील सत्ताधाऱ्यांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजप खासदार सुजय विखे-पाटील यांनी राज्यातील महाविकास आघाडीवर खोचक शब्दांमध्ये टीका केली आहे. चोरी केली नसेल, तर घाबरायचे कारण नाही, असे म्हणत महाविकास आघाडी सरकारवर टीका केली आहे.

ते पुढे म्हणाले की, देशात सत्तेचा वापर कुणी जास्त केला आहे, हे आणीबाणीच्या काळात देशाच्या जनतेने पाहिले आहे. काश्मिरी पंडितांवर झालेला अत्याचार देखील जनतेसमोर आला आहे. ज्या लोकांनी पैसे खाऊन कारखाने बांधले, संस्था केल्या हा गरीब जनतेचा पैसा नव्हता का? असा सवाल सुजय विखे-पाटील यांनी केला आहे.

सुजय विखे पाटील यांनी महाविकास आघाडीला नवरा, बायको आणि वरातींची उपमा दिली. महाविकास आघाडीचा संसार असा आहे, की यात लग्न राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे आहे. राष्ट्रवादी नवऱ्याच्या भूमिकेत आहे. त्याने काहीही मनमानी करावी, त्याला कुणी काही बोलत नाही. शिवसेना एका मुक्या बायकोसारखी आहे, जिला बोलता येत नाही आणि काँग्रेसवाले वराती आहेत. ज्यांना लग्नाची पत्रिका नव्हती, पण ते बिन बुलाए जेवायला गेले आहेत, असे सुजय विखे-पाटील म्हणाले.

# कार अपघातात एकाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी (दि. २६) ४.१५ वाजण्याच्या सुमारास वहूर गाव हद्दीत रस्ता ओलांडणाऱ्या एका इसमाला वॅगनर कारची जोराची धडक बसून या इसमाचा जागीच मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजेंद्र कमलाकर हजारे ६०, बदलापूर, ठाणे, हे वहूर गाव हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असताना अचानक एमएच ४३ बीएन ७६२९ या वॅगनर कारची जोराची धडक बसली. या धडकेत राजेंद्र कमलाकर हजारे यांचा जागीच मृत्यू झाला. कारचालक नितीन भार्गव सावंत, नवी मुंबई याच्यावर भादंवि कलम ३०४ अ, २७९, ३३७, ३३८ आणि मोटारवाहन कायदा कलम १८४ प्रमाणे कारवाई करण्यात आली. महामार्गावरील वाढलेल्या अपघातांमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २८ मार्च २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
■ २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन
■ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१५+ व १८+)
■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ )
■ ९. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+)
■ १०. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+)

कार्बेव्हॅक्स
■ ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

## निवडक

### बेवारस मृतदेहाच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल** : पाडेघर परिसरात पनवेलकडे जाणाऱ्या महामार्गाच्या बाजूला अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला. याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले व महिलेचा मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. याबाबत पनवेल शहर पोलिसांनी सीआरपीसी १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद करण्यात करण्यात आली आहे. या महिलेचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्ष, रंग सावळा, उंची ५ फूट १ इंच, केस सफेद, अंगामध्ये निळसर व राखाडी रंगाची साडी, गळ्यात पांढऱ्या मण्यांची माळ, नाकावर व चेहऱ्यावर काळपट डाग आहेत. या वर्णनाच्या महिलेची माहिती कोणाकडे असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत धनवडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### पोलिसाविरोधात विनयभंगचा गुन्हा

**नवी मुंबई** : नवी मुंबईतील रबाळे वाहतूक शाखेत कार्यरत असलेल्या पोलीस हवालदाराविरोधात याच ठिकाणी महिला पोलीस शिपाई म्हणून काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याने विनयभंगचा गुन्हा दाखल केला आहे. तर संबंधित हवालदारानेही मारहाण आणि मोबाईल चोरीप्रकरणी त्या महिला शिपायावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी रबाळे पोलीस अधिक तपास करीत आहेत. आरोपीने फिर्यादी यांच्या परिचित रिक्षाचालकाला मारहाण केली होती. ती सोडवण्यास गेलेल्या या महिला शिपायालाही अर्वाच्च शिवीगाळ करीत मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन आरोपीने केले. त्यामुळे त्यांच्याविरोधात या महिला शिपाई कर्मचाऱ्याने विनयभंगचा गुन्हा दाखल केला. तर आरोपीनेही मारहाण आणि मोबाईल चोरीप्रकरणी त्या महिला शिपाई विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी एकालाही अद्याप अटक केलेले नाही. आम्ही योग्य ती कारवाई करीत आहोत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. डी. ढाकणे यांनी दिली.

### कलिंगड, टरबूजच्या मागणीत वाढ

**नवी मुंबई** : गेला आठवडाभर उन्हाच्या तीव्र झळा बसत असल्याने एपीएमसीच्या फळ बाजारात थंडगार, रसाळ फळांना मागणी वाढली आहे. कलिंगड, टरबुजाची आवकही वाढली आहे. बाजारात आंब्यापाठोपाठ फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात कलिंगड आवक सुरू होते, तर मार्चपासून मागणीत वाढत होते. महाराष्ट्रासह तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून आवक होते. सध्या बाजारात टरबूज आणि कलिंगडच्या १०० ते १५० गाड्या आवक सुरू आहे. कलिंगड घाऊक बाजारात प्रतिकिलो १० ते १५ रुपये तर टरबूज २० ते २५ रुपये किलोने विक्री होत आहे. तर महिनाअखेपर्यंत २०० गाड्या आवक होईल अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली. बाजारात शुगरबेबी आणि नामधारी कलिंगडाची आवक सुरू असून शुगरबेबीला अधिक मागणी आहे.

# वाढत्या उष्म्याने होतेय अंगाची लाही लाही!

## ■ आरोग्याच्या समस्या वाढल्या; पुन्हा उष्णतेची लाट येण्याचा इशारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच वाढलेल्या उष्णतेने नागरिकांच्या अंगाची लाही लाही होत आहे. सकाळी नऊ वाजल्यापासूनच सूर्यनारायण आग ओकत असल्याने अनेक जण बाहेर पडणे टाळतना दिसत आहेत. वाढत्या उष्णतेमुळे मात्र अनेकांना आरोग्याच्या समस्या जाणवण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच पुन्हा सोमवारपासून (दि. २८) उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आल्याने नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढलेल्या उष्णतेमुळे अनेकांना ॲसिडीटी, अपचन, चक्कर येणे, अन्नावरची वासना जाणे अशा प्रकारच्या व्याधींनी जडले आहे. त्यामुळे सध्या नागरिकांनी आपल्या आरोग्याची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे.

सध्या कोरोनाबाधितांचा आकडा कमी झाल्याने सर्व नियम शिथिल करून ऑफिस, शाळा व महाविद्यालये नियमित सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे अनेक नोकरदारांसह विद्यार्थ्यांना कडक उन्हात बाहेर पडावे लागत आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या व्याधी जडण्याचे जास्त प्रमाण हे विद्यार्थी व २५ ते ४५ या वयोगटातील नोकरदार वर्गामध्ये असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे उष्म्यापासून वाचण्यासाठी नागरिकांनी शीतपेयांऐवजी काकडी, कलिंगड, केळे अशा फळांचे सेवन करावे. त्याचप्रमाणे लिंबू सरबत, कोकम सरबत यांसारखी पेये पिण्याचा सल्ला वैद्यकीय अधिकारी देत आहेत.


(संग्रहित छायाचित्र)

पुणे वेधशाळेने सोमवारपासून पुन्हा उष्णतेची लाट येण्याबाबत अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे राज्यातील अनेक शहरांमध्ये तापमान सुमारे ४२ ते ४५ सेल्सिअसपर्यंत वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### एसी, कुलरच्या मागणीत वाढ

वाढत्या उष्म्यापासून बचाव करण्यासाठी एसी, कुलर यांसारख्या इलेक्ट्रिक वस्तूंना मागणी वाढली आहे. त्यामुळे बाजारपेठेतील इलेक्ट्रिक वस्तूंचा बाजार तेजीत आल्याचे पाहायला मिळत आहे.

### कपडे बाजारही तेजीत

उन्हाळ्याच्या दिवसांत अनेक जण फिकट रंगाचे आणि सुती कापडे वापरण्याचा सल्ला देत असतात. त्यामुळे कपड्यांच्या दुकांनामध्येही काहीशी गर्दी होण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये खरेदीसाठी महिलांची संख्या लक्षणीय आहे. यासोबतच स्कार्फ, सनकोट, हॅण्डग्लोज यांचीही मागणी वाढली असल्याचे दुकानदारांनी सांगितले.

## सोनिया घरत आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित



**उरण : रामप्रहर वृत्त**

आपला सरपंच आपला गौरव ग्रामपंचायतीच्या विकासात नवराष्ट्रची साथ या कार्यक्रमातंर्गत उरण तालुक्यातील दिघोडे ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनिया मयूर घरत यांना सरपंच सम्राट पुरस्कार २०२२ने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली दिघोडे ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनिया मयूर घरत यांनी ग्रामपंचायतीमध्ये विविध कामे करीत गावाचा विकास साधला आहे. त्याचबरोबर कोरोना काळात जनजागृती, अन्नधान्य वाटप, लसीकरण मोहीम राबवून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतली. त्यामुळे त्यांना आदर्श सरपंच पुरस्काराने गौरविण्यात आले.

## नवीन कोर्टासमोरील रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण

### नगरसेवक विक्रांत पाटील यांचा यशस्वी पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

अमरधाम ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक या रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्णत्वाकडे आहे. या रस्त्याचे काँक्रीटीकरण झाल्यामुळे रस्त्याची उंची वाढली. त्यामुळे नवीन कोर्टकडे जाणाऱ्या रस्त्याला उतार जास्त होता. तात्पुरता उपाय म्हणून दगड आणि माती टाकून रस्त्याला उतार देण्यात आला होता, पण रस्त्याची स्थिती खराब झाली होती. याबाबत माहिती स्थानिकांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांना दिली. त्यांनी तातडीने महापालिका अधिकारी आणि ठेकेदाराशी चर्चा करून हा विषय निकाली काढला.

स्वतः जातीने उभे राहून रस्त्याचे काम व्यवस्थित होत आहे नाही याकडे लक्ष देऊन होते. प्रभागातील समस्या सोडवण्यास नगरसेवक विक्रांत पाटील हे नेहमीच प्राधान्य देत आले आहेत. समस्येचे



निरसन लवकरात लवकर करण्याकडे ते स्वतः जातीने लक्ष देत असतात. त्याबद्दल नागरिकांनी आणि स्थानिक रिक्षा चालकांनी समाधान व्यक्त केले आहे. या रस्त्यावरील पथदिवे लावण्याच्या कामालाही सुरुवात झाली आहे.

## सोसायटीतील रहिवाशांना पोलिसांचे मार्गदर्शन

### कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत केले आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील बालाजी रेसिडेन्सी कॉम्प्लेक्स, कल्पवृक्ष सोसायटी, समृद्धी सोसायटी व ग्रीनवूड फेज २ या सोसायटींमधील रहिवाश्यांमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवीद्र दौंडकर, वावंजे पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबिका अंधारे, कल्पवृक्ष व बालाजी सोसायटीचे चेअरमन सुनील पाटील यांनी सोसायटीतील रहिवाशांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला सोसायटीतील रहिवाशांनी प्रतिसाद दिला. तसेच सर्व कमिटी अध्यक्ष व सहकारी आणि सर्व रहिवाशांनी एकत्रित राहून प्रशासनाला सहकार्य करू, अशी हमी दिली.



या सभेमध्ये रहिवाशांच्या सुरक्षेसाठी कोणती काळजी घ्यावी याबाबत विस्तृतपणे संवाद साधला. ज्येष्ठ नागरिकांना काही मदत लागल्यास हेल्पलाईन नंबर १०५८ वर संपर्क साधता येईल, याबाबतही माहिती दिली. तसेच या ५ सोसायटीत लवकरात लवकर एमआयडीसीचे पाणी यावे, घंटागाडी सुरू व्हावी यासाठी प्रयत्नशील आहोत, असे सुनील पाटील असे सांगितले. यासाठी सर्व सोसायटीतील रहिवाशांच्या सहकार्याची आवश्यकता असून सर्वांनी एकत्र येऊन काम करूया, असे आवाहन केले व सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबाबत आभार व्यक्त केले. तसेच इतर काही प्रश्न असतील तर त्याचा पाठपुरावा करीत आहोत, असे सांगितले.

## मोहोपाड्यातील रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

### पैशांची बॅग केली परत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रिक्षाचालक आदम शेख यांनी चांभार्ली येथील कौतुभ जगताप यांची रस्त्यात पडलेली पैशाने भरलेली बॅग त्यांना परत केली. त्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

कौतुभ जगताप यांचा दूध व्यवसाय असून ते चांभार्लीहून आपल्या स्कुटीवरून बँकेत पैसे भरणा करण्यासाठी रस्त्याने जात असताना त्यांच्या नकळत स्कुटीवरून बॅग खाली पडली. पुढे ते यावेळी सेबी वळणावर एचडिएफसी बँकेसमोर आल्यानंतर



आपली ५१ हजार रुपये रोख असलेली बॅग हरविल्याचे जगताप यांच्या लक्षात आले. याचवेळी रस्त्यात पडलेल्या या बॅगेकडे रिक्षाचालक आदम शेख यांचे लक्ष गेले. त्यांनी तातडीने रिक्षा बाजूला घेऊन पाहिले असता त्या बॅगेत ५१ हजार रुपये असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या वेळी रिक्षाचालक आदम शेख यांनी तातडीने पैशांची बॅग घेऊन टाकेदेवी रिक्षाचालक संघटनेचे उपाध्यक्ष फुलचंद लोंढे यांना फोनवरून याबाबत माहिती दिली.

बॅगेत रोख रक्कम व बँकेची स्लिप होती. त्यांनी बॅगेला काही न करता तसेच ठेवून रिक्षा चालक-मालक संघटनेचे वरिष्ठांना त्यांनी कळवले आणि सर्व ग्रुपवर त्यांनी याची माहिती पाठवली.

टाकेदेवी रिक्षा चालक-मालक संघटनेचे स्टँड प्रमुख किरण पवार यांच्या प्रयत्नाने ज्या व्यक्तीची पैशाची बॅग हरवली होती, त्यांचापर्यंत पोहचवण्याचे काम किरण पवार यांनी केले. कौस्तुभ जगताप यांनी आदम शेख व टाकेदेवी रिक्षा चालक-मालक संघटनेच्या सर्व रिक्षाचालकांना धन्यवाद दिले.

रिक्षाचालक आदम शेख यांनी आपला प्रामाणिकपणा दाखविल्याने टाकेदेवी रिक्षाचालक संघटनेचे अध्यक्ष संदीप मुंढे यांनी रिक्षाचालक आदम शेख यांचे शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन आभार मानले.

## नवीन पनवेलमध्ये राजस्थानी महिलांकडून दशामाता दिन

**पनवेल : प्रतिनिधी**

राजस्थानी महिलांनी रविवारी नवीन पनवेलमधील विचुंबे पुलाजवळ असलेल्या पिंपळाची पूजा करून त्याला दोरा गुंडाळून दशामाता दिन साजरा केला.

चैत्र महिन्यातील कृष्ण पक्षातील दशमीला बिहार आणि राजस्थानमध्ये दशामाता पूजा केली जाते. दहाव्या दिवशी महिला पारंपरिक पोशाख करून पिंपळा समोर पतवाढीची पूजा करतात. नंतर पिंपळाला सात प्रदक्षिणा मारून त्याला दोरा गुंडाळतात आणि प्रार्थना करतात त्यानंतर ही पूजा समाप्त होते. आपल्या कुटुंबाची बिघडलेली दशा चांगली व्हावी यासाठी बिहार आणि राजस्थानमध्ये होळीच्या दिवसापासून दहा दिवस दशमाता पूजा केली जाते. या दिवसात त्यांच्यापैकी एकाच्या घरी दशमातेची स्थापना केली जाते. महिला एकत्र जमून देवीची गाणी म्हणतात. या दहा दिवसांत एक वेळ जेवून उपवास करतात.



## समाजप्रबोधन करताना अध्यात्मासह आधुनिक तंत्रज्ञानाचीही गरज

### हभप भिकाजी महाराज यांचे प्रतिपादन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

समाजाची सेवा करताना, शिक्षणाला आध्यात्मिक व वैज्ञानिक शिक्षणाबरोबर तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे, तरच शाश्वत विकास होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ कीर्तनकार, भगवान श्रीसद्गुरू गणेशयोगीराज महाराज वारकरी संस्थेचे अध्यक्ष हभप भिकाजी महाराज कदम यांनी केले.



खालापूर तालुक्यातील राजिप प्राथमिक शाळा वावंढळ येथे भगवान श्रीसद्गुरू गणेश योगिराज महाराज वारकरी संस्थेच्या वतीने शाळेला तीन स्मार्ट टीव्ही, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व खाऊचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

संस्थेचे सचिव हभप सुभाष सावंत यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शैक्षणिक प्रगती झाली तरच देश विकासाच्या मार्गावर दिसेल. कोरोना काळात पंतप्रधान निधी व मुख्यमंत्री निधीला या संस्थेने भरघोस मदत केली आहे. तर कोरोना काळात ग्रामीण भागात मास्क, सॅनिटायझर वाटप, आर्थिक मदत केली असून व्यसनमुक्ती व स्वच्छता मोहिमेसाठी गावोगावी भ्रमणदिंडी काढली जाते, आतापर्यंत १२० भ्रमण दिंड्या काढण्यात आल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष हभप रामचंद्र महाराज होते. शाळा डिजिटल करताना व शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी देखील मदतीचे आश्वासन देण्यात आले आहे.

कार्यक्रमास हभप बळीराम कदम, ज्येष्ठ नागरिक शिवरामराव कदम, हभप पांडुरंग कदम, दत्ताजी कदम, परशुराम कदम, शाळा समिती अध्यक्ष पवार, मुख्याध्यापक बाविस्कर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतातील सर्व विमान कंपन्यांकडे सध्या किती विमाने आहेत?**

अ.) १०१० आ.) ७१० इ.) ५१० ई.) ३१०

**२. रिझर्व बँक ऑफ इंडियाने अलीकडेचबंगळूर येथे रिझर्व बँक इनोवेशन हबची स्थापना कोणत्या उद्देश्याने केली आहे?**

अ.) डिजिटल व्यवहार वाढण्यासाठी आ.) बँकेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी इ.) आर्थिक सेवा आणि उत्पादने गरीबांपर्यंत पोचण्यासाठी ई.) क्रेडीट कार्डचा वापर वाढण्यासाठी

**३. भारताचा हा शेजारी देश सध्या अतिशय गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे.**

अ.) बांगलादेश आ.) नेपाळ इ.) भूतान ई.) श्रीलंका

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka, Old Panvel, Pin - 410 206.

**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# मोदी सरकारचा अन्नदिलासा

कोरोना काळात गोरगरिबांसाठी सुरू केलेल्या पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेला मोदी सरकारने आणखी सहा महिने मुदतवाढ दिली आहे. भारतवर्षाचे सामर्थ्य देशातील एक एक नागरिकाच्या शक्तीमध्ये आहे. त्या शक्तीला ताकद देण्यासाठी सरकारने या योजनेला मुदतवाढ दिल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

**काँग्रेसच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी गरिबी हटाव अशी घोषणा केली होती. प्रत्यक्षात देशातील गरिबी काही हटली नाही, पण फसव्या व सवंग घोषणांमुळे काँग्रेस सत्तेवरून पायउतार झाली. आता तर काँग्रेसला विरोधी पक्ष म्हणावे का इतकी त्यांची बिकट अवस्था झाली आहे. याला काँग्रेसचा भ्रष्ट आणि निष्क्रिय कारभार कारणीभूत आहे. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या जनतेने त्यांना देशाची सत्ता बहाल केली त्या जनतेला विविध योजना, निर्णय, उपक्रमांमधून दिलासा देण्याचे काम सातत्याने सुरू आहे. म्हणूनच देशवासीयांनी त्यांना सलग दुसऱ्यांदा आपले नेता म्हणून निवडले. त्यानंतर देशाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून सुरू आहे. वैश्विक महामारी कोरोनाने संपूर्ण जगात न भरून निघणारी हानी केली. अमेरिका, इंग्लंड यांसारखे महासत्ता म्हणून ओळखले जाणारे देशही कोरोनामुळे ढासळले. आपल्या देशालादेखील कोरोनामुळे फटका बसला. एवढी मोठी लोकसंख्या असलेल्या भारतात कोरोनाने हाहाकार उडाला होता. या संकटकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना हरतऱ्हेने मदत केली. कोरोनामुळे सर्वकाही ठप्प झाल्याने गोरगरिबांचे हाल होऊ नये म्हणून त्यांच्यासाठी मोदी सरकारने पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली. या योजनेतील नागरिकांना रेशनकार्डवर मोफत धान्य दिले जाते. यात तीन किलो गहू आणि दोन किलो तांदूळ प्रति व्यक्ती दिला जातो. या योजनेचा तब्बल ८० कोटी नागरिकांना लाभ झालेला आहे. कोरोनाची तिसरी लाट पंतप्रधान मोदींच्याच सर्वांत मोठ्या लसीकरण मोहिमेमुळे थोपविण्यात भारताला यश आले, पण आगामी काळात चौथी लाट येण्याचा धोका व्यक्त करण्यात आला आहे. कोरोनानंतर विस्कटलेली घडी पूर्णत: बसलेली नाही. त्यामुळे गरीब व्यक्तींसाठी सुरू केलेल्या अन्न योजनेला मोदी सरकारने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ही योजना आता सप्टेंबर २०२२पर्यंत सुरू राहील. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियमानुसार लाभार्थ्यांना नियमित धान्य ठराविक किंमत आणि वजनाप्रमाणे या अन्न योजनेंतर्गत मोफत वाटप केले जाते. सरकारने या योजनेवर आतापर्यंत २.६० लाख कोटी रुपये खर्च केले आहेत. पुढच्या सहा महिन्यांपर्यंत म्हणजे सप्टेंबर २०२२पर्यंत आणखी ८० हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. म्हणजेच या योजनेसाठी एकूण ३.४० लाख कोटी खर्च असणार आहे. कोविड विषाणूचा प्रादुर्भाव जवळपास संपला असला आणि व्यवहारांना गती मिळाली असली तरी अर्थव्यवस्था सुरळीत होण्याच्या काळात गरीब कुटूंब उपाशी राहू नये यासाठी पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेला मोदी सरकारने आणखी सहा महिने मुदतवाढ दिली आहे. केवळ आश्वासने न देता आपल्या कृतीतून सर्वसामान्य घटकांना दिलासा देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत. त्यामुळेच त्यांना व त्यांच्या पक्षाला सातत्याने यश मिळत असल्याचे दिसून येत आहे.**

# माथेरानमध्ये निसर्गाची रंगपंचमी...

## खबरबात

संतोष पेरणे

वसंत ऋतू सुरू झाला कि माथेरानच्या जन्गलात वृक्षाच्या पानांची नवीन पालवी रंगाची उधळण करू लागते. सध्या माथेरान घाट रस्त्यावरील विविध रंगांची उधळण झाडांवरील पालवीने उधळली असून माथेरान घाट रस्त्यात निसर्गाच्या रंगांनी भरून गेला आहे.

निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी प्रत्येक ऋतूत निसर्ग आपली किमया दाखवत आहे. त्यात शिशिर ऋतूत पानगळती होऊन वसंत ऋतूमध्ये नवीन पालवी फुटून निसर्गाचे नवीन रूप, येथील निसर्गाची अदभूत लीलया, वसंत ऋतूमधील नैसर्गिक रंगपंचमीच्या छटा, रंगांची उधळण ही नयनरम्य दृश्य येथे आलेल्या पर्यटकांना अनुभवयास मिळणार आहे. माथेरान हे निसर्गाने नटलेले पर्यटनस्थळ असून येथे सर्व ऋतूंत नयनरम्य देखावे आणि निसर्गाची वेगवेगळी रूपे येथे पहावयास मिळतात. वसंतपंचमीपासून वसंत ऋतूला सुरवात होते. रंगपंचमी आलेली असताना निसर्ग मुक्तहस्ताने रंगाची उधळण करत असताना येथे दिसतो.



वसंत ऋतूमधील नैसर्गिक अविष्काराने वेगवेगळ्या रंगांची उधळण मुक्त हस्ते केलेली ही नयनरम्य दृश्ये माथेरानच्या जंगलात दिसू लागली आहेत. हिवाळा संपत असताना डोंगरातील गवताने काळसर रंग अंगावर परिधान केला आहे. त्याला आता नवीन साज मिळाला आहे तो वसंत ऋतूमुळे. माथेरानमध्ये डोळ्यांची पारणे फेडणारी वनराई पर्यटकांसाठी महत्त्वाची आहे. वसंत ऋतूमध्ये या डोंगरावर मन अगदी प्रसन्न होते. सर्व ऋतूंतच नयनरम्य देखावे येथे पाहायला मिळतात. सध्या माथेरानच्या वृक्षांनी आपले रूपडे पालटून घेतले आहे. निसर्गातील हा रंगोत्सव डोळ्याचे पारणे फेडतो. डोंगर शिवारामध्ये काटेसावर, पळस अनेक वृक्ष ही आपल्या पूर्ण फुलांनी नजरेस पडत आहेत. फुलांच्या वेगवेगळ्या रंगछटा, त्याचे वैभव पाहत असतो. हिरव्याकंच असणाऱ्या फेडत असतो. कोवळी पाने, गडद लाल पाने, तर पुढे एकेक दिवस आणखी रंग बदलून पुन्हा हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करतात. वसंत ऋतूत झाडांची पाने आपली पूर्वावस्था धारण करतात. हा प्रवास निसर्गप्रेमींसाठी पर्वणी आणि नजरेस सुखावणारा आहे. वसंतोत्सवातील प्रमुख सण म्हणजे रंगपंचमी हा रंगांचा सण आनंद द्विगुणित करणारा आहे.वसंताच्या आगमनाबरोबर निसर्गही रंगपंचमी खेळायला सुरुवात करतो. वेगवेगळ्या रंगांची मुक्तहस्ते उधळण करतो. कधी वातावरणातील आणि मनातील मरगळ झटकून निसर्गात अनेक ठिकाणी तर कुठे पांगारा, काटेसावर बोगनवेल अशी विविध प्रकारची फुलझाडे बहरतात तेव्हा अवचित आपले लक्ष वेधून घेतात, पण माथेरानचा डोंगरकुशीत त्यांच्या अंगाखांद्यावर फुलांच्या बरोबरच अनेक झाडांच्या पानांनी रंग भरलेला दिसून येतो. सुरुवातीला पानगळ झाली आणि निसर्गात अगदी नैराश्य निर्माण झाले आणि थोड्याच दिवसांत पुन्हा त्या झाडाला नवी पालवी निर्माण झाली. पुन्हा नवचैतन्य निसर्गामध्ये निर्माण झाले आहे. अशा या रंगोत्सवात रंग खेळणारा निसर्ग आज माथेरानच्या अवतीभोवती दिसतोय.



याच माथेरानमधील डोंगर पावसाळ्यात हिरवाईने नटलेला असतो आणि येणाऱ्या पर्यटकांना निसर्ग मुक्तहस्ताने रानमोगरा आदी पुष्पवैभव दिमाखात झाडांमधून कोवळी पालवी आपल्याला रस्त्याच्या आजूबाजूला नव्या पालवीने फुललेली वनराई रंगांची उधळण करत असताना इथे नजरेस पडते, तर त्याचबरोबर करून रंगेबिरंगी छटा दिवसागणिक बागेत पिवळ्या झुपक्याचा बहावा नव्याने नव्या उमेदीने दिसतो. कुठे जांभळ्या रंगाच्या जलप्रपात शुभ्र पाण्याचे निर्झर बहरतो. मोगऱ्याची फुले निसर्गाच्या आपला अवतार बदलू पाहत आहे. झाडांची लाल पाने आणि पुढे आणखी एक एक दिवस रंग बदलून पुन्हा आपल्या हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने आपली पूर्ववस्था धारण करतात. हा प्रवास निसर्गप्रेमींसाठी पर्वणी आणि नजरेस सुखावणारा आहे. या ऋतूत माथेरानच्या डोंगर शिवारामध्ये अनेक वृक्षसुध्दा आपल्या पूर्ण फुलांनी आपला अवतार बदलू पाहतात व हिरव्यागार झाडांमधून कोवळी पालवी धारण करून रंगीबिरंगी छटा आपल्या नजरेस पडतात. हा वसंत ऋतू पक्षासाठी सुद्धा खूप महत्त्वाचा आहे. हा महिना पक्षांच्या मनोमिलनाचा असते आणि हे फक्त माथेरानमध्येच पहायला मिळते. यामुळे निसर्गप्रेमी पर्यटक या महिन्यातच माथेरानला भेट देत असतात. माथेरानचा निसर्ग भुरळ घालणारा आहे. या ऋतूत पानगळती अन् झाडांना येणारी नवीन पालवी हे याच ऋतूत पाहयला मिळते. हा वसंत ऋतूतील निसर्ग पर्यटकांना आकर्षित करीत असून माथेरानला येण्यासाठी पर्यटकांना खुणावत आहे.

निसर्गाची वेगवेगळी रूपे येथे पहावयास मिळतात. पळस हा वृक्ष फुलतो आणि काटेसावर बहरतो. मोगऱ्याची फुले येथील निसर्गाच्या श्रुंगारात भर टाकतात आणि सुरू होतो तो निसर्गाचा रंगोत्सव. या रंगोत्सवात वसंत ऋतूत झाडाला येणारी नवीन पालवी ही पर्यटकांचे मोठे आकर्षण ठरत असते. पानगळती झालेल्या पाल्यापाचोळ्यातून चालताना कडक पाला तुटण्याचा होणारा आवाज यामुळे पर्यटक अगदी आनंदी होतात. तर करंज, आंबा, कोलारा या झाडांना आलेल्या नवीन पालवीवर सूर्यकिरणे पडल्यावर पालवी चमकताना दिसते हे खरे पर्यटकांना आकर्षित करतात.

माथेरानच्या जंगलात झाडांची झालेली पानझड आणि दुसरीकडे गुलाबी कोवळी पाने आणि नंतर गडद लाल पाने आणि पुढे आणखी एक एक दिवस रंग बदलून पुन्हा आपल्या हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने आपली पूर्ववस्था धारण करतात. हा प्रवास निसर्गप्रेमींसाठी पर्वणी आणि नजरेस सुखावणारा आहे. हा वसंत ऋतू पक्षांसाठीसुद्धा खूप महत्त्वाचा आहे. त्यामुळे येथील या निसर्गात सकाळपासून बुलबुल, कोळीला, साळुंकी, कूटरुक आणि स्वर्गीय नर्तक या पक्षांचा किलबिलाट ऐकावयास मिळतो आणि हे सुंदर चित्र सध्या पाहायला, अनुभवायला मिळत आहे.


# कर्जत चारफाटा ते भिसेगाव रस्त्याच्या कामाची पाहणी

**कर्जत : बातमीदार**

कर्जत येथील चारफाटा ते भिसेगाव या भागातील रस्त्याचे काम गेले अनेक महिने सुरू आहे. रस्त्याच्या एका बाजूचे काम पूर्ण झाले असून त्या कामाची पाहणी नगर परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आली.

कर्जत चारफाटा ते श्रद्धा हॉटेल (न्यू बिकानेर) रस्ता खराब झाला होता. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ होती. हा रस्ता व्हावा अशी भिसेगावमधील नागरिकांची मागणी होती. त्यासाठी त्यांनी नगर परिषदे शी पत्रव्यवहार केला होता. याबाबत उपोषणही करण्यात आले होते. तांत्रिक कारणामुळे रस्त्याचे काम रखडले होते. तांत्रिक अडचण दूर झाल्यानंतर एमएमआरडीएमार्फत चारफाटा ते श्रद्धा हॉटेल या रस्त्याच्या कामासाठी सुमारे पाच कोटी इतका निधी कर्जत नगर परिषदेकडे वर्ग करण्यात आला होता. त्या अनुषंगाने रस्त्याचे काम सुरू झाले आहे.





(छाया : संतोष पेरणे)

कर्जत नगर परिषद हद्दीत असलेल्या चारफाटा ते भिसेगाव (न्यू बिकानेर) या ६०० मीटर लांबीच्या रस्त्याच्या एका बाजूचे काँक्रिटीकरण पूर्ण झाले असून त्याची पाहणी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील आणि शहर अभियंता मनीष गायकवाड यांनी केली.

# अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्या खोपोलीतील भक्ती साठेलकरचा सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर नित्याने अपघात होत असतात. त्या अपघातांमधील जखमींना वेळीच तातडीची उपचाराची गरज असते. त्यासाठी खोपोलीत अपघातग्रस्तांच्या मदतीने हा सोशल ग्रुप अनेक वर्षांपासून काम करीत आहे, या ग्रुपमधील एक महिला भक्ती साठेलकरही इतर कार्यकर्त्यांसोबत रात्री-अपरात्री अपघातग्रस्तांना मदत करीत असते. तिचा राज्य शासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत प्रादेशिक परिवहन महामंडळाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना शनिवारी (दि. २६) वाशी येथील विष्णूदास भावे सभागृहात सन्मानित करण्यात आले. या वेळी खोपोलीतील भक्ती साठेलकरच्या सेवाभावी कार्याची दखल घेत तिचाही सन्मान करण्यात आला.

भक्ती ही अपघातग्रस्त मदत टीमचे प्रमुख गुरुनाथ साठीलकर यांची कन्या आहे. लहानपणापासून सामाजिक कार्याचा वसा तिने आपल्या वडिलांपासून घेतला आहे. तिच्या सन्मानाच्या पार्श्वभूमीवर खोपोलीत तिच्यावर सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



(छाया : विनायक माडपे)

## आरोग्य प्रहर



### चांगल्या झोपेसाठी 'या' पाच गोष्टींचा आहारात करा समावेश

अनेकदा रात्री आपल्याला झोप लागत नाही. अनेकांनी ही समस्या भेडसावते. यावर काही उपाय केल्यास तुम्हाला चांगली झोप लागू शकते. घरातीलच काही पदार्थ खाल्याने तुम्हाला शांत झोप लागू शकते.

अनेकदा रात्री आपल्याला झोप लागत नाही. अनेकांनी ही समस्या भेडसावते. त्यामुळे रात्री जागरण होते आणि त्याचा आपल्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. अनेकदा आपण आजारी पडतो. व्यस्थित झोप घेतली की हृदयरोग, मधुमेह आणि वजन वाढण्याचा धोका कमी होतो. आपण सकस आहार आणि रात्री चांगली झोप घेणे उत्तम आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. यावर काही उपाय केल्यास तुम्हाला चांगली झोप लागू शकते. घरातीलच काही पदार्थ खाल्याने तुम्हाला शांत झोप लागू शकते. मनुके, दूध, केळी, बदाम, गवती चहा या पदार्थांचा तुमच्या आहारात समावेश करा आणि फरक अनुभवा.

**मनुके-** मनुक्यांमुळे चांगली झोप येण्यास मदत होते. यात व्हिटॅमिन बी ६, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम आहेत. ते मेलाटोनिनच्या उत्पादनात मदत करतात. मनुक्यांमुळे आपल्या शरिरात चांगल्या प्रकारचे हार्मोन तयार होतात. जे झोपेला प्रोत्साहन देतात. झोपण्याच्या ३० मिनिटे आधी तुम्ही मनुके खाऊ शकता. तुम्ही ते तुमच्या रात्रीच्या जेवणात समाविष्ट करू शकता किंवा ते एका ग्लास कोमट दुधासोबत घेऊ शकता. यामुळे तुम्हाला शांत झोप लागू शकते.

**दूध-** आयुर्वेदानुसार एक कप कोमट दूध प्यायल्याने चांगली झोप लागते. रात्री चांगली झोप येण्यासाठी एक ग्लास कोमट दूध प्या. गरम दुधात चिमूटभर जायफळ, हळद किंवा अश्वगंधा पावडर टाकू शकता. यामुळे तुमची झोपेची समस्या दूर होऊ शकते.

**केळी-** आयुर्वेदानुसार, रात्री केळीचे सेवन करणं फायदेशीर आहे. यामध्ये मॅग्नेशियम आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी ६ शरीराच्या स्नायूंना आराम देण्याचे काम करतात. त्यामुळे झोप येण्यास मदत होते.

# नेरळमध्ये गानसम्राज्ञी स्व. लतादिदींना संगीतमय श्रद्धांजली

**कर्जत : बातमीदार**

गानसम्राज्ञी, भारतरत्न स्व. लता मंगेशकर यांना नेरळमध्ये श्री गजानन सामवेदिका संगीत क्लास यांच्या माध्यमातून संगीतमय श्रद्धांजली वाहण्यात आली. या क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लतादिदींची अजरामर गाणी या वेळी सादर केली.

श्री गजानन सामवेदिका संगीत प्रशिक्षण केंद्राच्या वतीने स्व. लता मंगेशकर यांना श्रद्धांजली म्हणून लतादिदींनी गायलेल्या व स्वरबद्ध केलेल्या गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री गजानन सामवेदिकेचे अक्षय जोशी, अमेय जोशी, बल्लाळ जोशी, अजय गायकवाड,कर्जत तालुका सहकारी संस्थेचे अध्यक्ष अरुण धारप यांनी स्व. लतादिदींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले,. कार्यक्रमात





विद्यार्थ्यांनी सुरुवातीला थोडे शास्त्रीय संगीत गायले. त्यानंतर गगनसदन तेजोमय, मोगरा फुलला, मायभवानी तुझे लेकरु, नको देवराया अंत आता पाहू, सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या, लगजा गले, अजीब दास्ता है ये, ज्योती कलश झलके, ऐरणीच्या देवा तुला, मधु मागसी माझ्या सख्या परी, मायेन न मायेन ने रूप तेरी, आओ तुम्हे चांदपे ले जाये, नैनो मे बदरा छाए, खेळ मांडियेला वाळवंटी घाई, शुर आम्ही सरदार आदी विविध प्रकारची गीते ज्येष्ठ विद्यार्थी प्रज्ञा सोमाणी, सीमा पटवर्धन, संध्या भडसावळे, भक्ती जोशी, सुयोग चारी तसेच आरोही जोशी, वैष्णवी चारी, सिद्धश राणे, गार्गी सदावर्ते, अदिती चोचे, रूचा सुकाळे, नेहा जाधव, निकिता बाकळे, रूचा कुलकर्णी,आर्जवी वैद्य इ. विद्यार्थ्यांनी आपल्या परीने उत्तम सादर केली.

गायक-गायकांना पंकज जाधव, नंदा सावंत, आणि अमेय जोशी उत्तम साथ संगत केली.

अक्षय जोशी यांनी कार्यक्रमाचे संगीत संयोजन व प्रत्येक गीताशी निगडीत लतादिदींच्या आठवणी सांगत निवेदनही केले.

कार्यक्रमास संगीतप्रेमींची भरपूर दाद मिळाली. या क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या पालकांसह विनायक रानडे, शिरीष चाफेकर, विवेक भडसावळे, गजानन म्हात्रे, श्रीराम सोमाणी डॉ. आशिष कर्वे, डॉ. अश्विनी कर्वे, डॉ. आदिती कर्वे, आनंद काळे, आसावरी काळे, स्नेहल साठे जयश्री रानडे, अथर्व कर्वे, श्रेयस सोमाणी, धृव गोमारे आदी उपस्थित होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयोस्तुते या अजरामर गीताबद्दल अक्षय जोशी यांनी एक विशेष आठवण सांगितली व सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र गायलेल्या याच समूहगानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पांढऱ्या कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी

## ▪ उत्पादन घटले; अवघे ५० टक्के पीक बाजारात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांत झालेल्या अवकाळी पावसाने तालुक्यातील प्रसिद्ध पांढऱ्या कांद्याला मोठा फटका बसला आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून बाजारात पाठविण्यास सुरुवात झाली असली तरी उत्पन्नात घट झाल्याने केवळ ५० टक्के पांढरा कांदा बाजारात दाखल झाला. दोन महिन्यांत ३५ टन कांदा बाजारात दाखल होणे अपेक्षित होते. परंतु, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले आहे. आतापर्यंत १८ टन कांदा बाजारात पाठविण्यात आला. या कांद्याला डोंबिवली, वाशी, पुणे, मालाड, बीड येथून प्रचंड मागणी आहे.

अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, तळवली, वाडगाव आदी गावांसह रोहा व माणगाव तालुक्यात पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते. या कांद्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळत असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना यातून सुमारे ३० लाखांची



उलाढाल होते. ३०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रात कांद्याची लागवड केली जाते.

अवकाळी पावसामुळे यंदा लागवड एक महिना पुढे गेली. डिसेंबरमध्ये बाजारात येणारे हे पीक जानेवारीत बाजारात जाण्यास तयार झाले. स्थानिक बाजारांसह रायगड व अन्य जिल्ह्यांतील बाजारात पांढऱ्या कांद्याला प्रचंड मागणी वाढली आहे.

दोन महिन्यांत आतापर्यंत ३५ टनाऐवजी केवळ १८ टन कांद्याचा पुरवठा करण्यात आला आहे. तो वाशीसह अन्य बाजारात दाखल करण्यात आला आहे. मुंबईसह पुणे, डोंबिवली, बीड येथून कांद्याला प्रचंड मागणी आली आहे, परंतु त्याचा तुटवडा निर्माण झाला आहे.

केवळ आठ दिवस पुरेल, इतकाच कांदा उपलब्ध असल्याची माहिती कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून देण्यात आली.

**तब्बल ५० रुपयांनी महागला**

*अवकाळी पाऊस, बदलत्या वातावरणामुळे पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. यंदा केवळ ५० टक्केच कांद्याचे उत्पादन झाले. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेने प्रतिकिलोला हा कांदा २० ते ४० रुपयांनी महाग झाला आहे. लहान आकाराच्या १० किलो कांद्यासाठी ६०० रुपये तर मोठ्या आकाराच्या कांद्यासाठी ८०० रुपये द्यावे लागत आहेत. गेल्या वर्षी हाच कांदा ४०० ते ५०० रुपयांना मिळत होता.*

**अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला भौगोलिक मानांकन मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी पांढरा कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात केली, परंतु अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची फार मोठी निराशा केली.**
**–सतीश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी**

**पांढऱ्या कांद्याला जीआय संस्था प्रमाणपत्र मिळाल्यावर शेतकऱ्यांची नोंदणी होणार आहे. दुसऱ्या जिल्ह्यातील कांदा अलिबागच्या नावाने विकल्यास ते कारवाईस पात्र ठरणार आहेत.**
**–दत्तात्रेय काळभोर, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रायगड**



## खोपोली चिंचवलीत नवतरुण सेवा फाउंडेशनतर्फे स्वच्छता अभियान

**खोपोली : प्रतिनिधी**

आपले गाव आपला परिसर स्वच्छ हवा तसेच रोगराईपासून दूर राहावे असा संदेश देत नगरपालिका हद्दीतील चिंचवली शेकीन या गावातील नवतरूण सेवा फाउंडेशन मंडळाच्या २० कार्यकर्त्यांनी स्वच्छता अभियान राबविली.

शहर गाव स्वच्छ ठेवणे ही नगरपालिकेचीच जबाबदारी नाही तर प्रत्येक नागरिकाचे स्वच्छता राखण्याचे कर्तव्य आहे. यासाठी रविवार सुट्टीचा दिवस पाहून गावातील सर्व तरुण शाळेजवळ एकत्र आले. हातात झाडू, घमेले घेऊन गावातील सर्व रस्ते, गल्ली स्वच्छ करून तो कचरा एकत्रित कचरापेटीत जमा केला.

प्रत्येक रविवारी आम्ही स्वच्छता अभियान राबविणार आहोत. पुढच्या वेळी परिसरातील वस्ती, शाळा क्रमांक ९ पटांगण, सरस्वती नगर, गणेश नगर, व इतर भागात स्वच्छता मोहीम राबविणार असल्याचे कार्यकर्त्यांनी या वेळी सांगितले. यामुळे सर्व तरुणांचे परिसरातून कौतुक होत आहे. या अभियानात माजी उपनगराध्यक्ष रमेश जाधव यांनी स्वच्छता अभियानास मार्गदर्शन केले.

# कर्जत शहरातील रस्त्यांसाठी सह्यांची मोहीम

## पालिका प्रशासनाचे वेधले लक्ष

**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

कर्जत शहरातील रस्त्यांवर वाहतूक कोंडी आणि अवैध पार्किंग यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कर्जत विकास समितीने रस्त्यांनी मोकळा श्वास घ्यावा यासाठी सह्यांची मोहीम हाती घेतली आहे. कर्जतकरांनी या मोहिमेला मोठा प्रतिसाद दिला असून ७००हून अधिक सह्या नागरिकांनी रविवारची सुट्टी असतानाही उपस्थिती लावून मोहीम यशस्वी केली.

कर्जत शहरात रस्ते रुंद झाले असून सर्व रस्त्यांवर वाहनांची अवैध पार्किंग होम असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. तसेच मुख्य रस्त्यावरच टपऱ्या आणि हातगाड्यांमुळे पादचाऱ्यांनाही चालताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. बाजारपेठेतील स्टेशनकडे




जाणारा मुख्य रस्ता, कर्जत पोस्ट ऑफिसजवळील चौकातील रस्ता, महावीर पेठ, रेल्वेस्टेशन चौक, सरकारी दवाखाना चौकातील रस्ता ही वाहतूक कोंडीची केंद्रे बनली आहेत. त्यामुळे कर्जत विकास संघर्ष समितीने शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेण्यासाठी सह्यांची मोहीम राबविली. या मोहिमेला ज्येष्ठ नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली.

शहरातील दोन ठिकाणी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली असून रविवारी (दि. २७) सुट्टीचा दिवस असूनदेखील ७०० हून अधिक नागरिकांनी स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होत फलकावर स्वाक्षरी केली. बहुजन विद्यार्थी संघटनेने लेखी पत्र देऊन आपला पाठिंबा वाहतूक कोंडी प्रश्नी कर्जत विकास समितीला दिला आहे. सह्यांची मोहीम यशस्वी करण्यासाठी कर्जत विकास संघर्ष समितीचे अॅड. कैलास मोरे, राजाभाऊ कोठारी, कृष्णा जाधव, विनोद पांडे, जयवंत म्हसे, प्रभाकर गंगावणे,शिवसेवक गुप्ता, अजय वर्धावे, मन्सुर बोहरी, मुकेश पाटील, अरविंद मोरे, मल्हारी माने, प्रशांत उगले, धनंजय दुर्गे, अमिर मनियार, निलेश हरिश्चंद्रे, सुमेश शेट्ये, किशोर तावरे यांच्या पुढाकाराने स्वाक्षरी मोहीम यशस्वी झाली.




**माणगाव : भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांचे शनिवारी भाजपतर्फे तालुका अध्यक्ष आप्पा ढवळे व सहकारी कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. या वेळी महिला मोर्चा तालुका अध्यक्ष शर्मिला सत्वे यांनी सोमय्या यांचे औक्षण केले.** (छाया : सलीम शेख)

# धाटाव येथील शिबिरात दाखले वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

कातकरी, आदिवासी उत्थानअंतर्गत धाटाव तलाठी सजेमधील आदिवासी बांधवांना उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार कविता जाधव, प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव व निवासी नायब तहसीलदार राजेश थोरे यांचे मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. २५) बारसोली आदिवासी वाडी येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी धाटाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक मोरे, ग्रामविकास अधिकारी दिपक चिपळूणकर, सामाजिक कार्यकर्ते रोहिदास पाशीलकर यांसह अंगणवाडी सेविकांसह आदिवासी, कातकरी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोहा मंडळ अधिकारी भरत गुंड व धाटाव सजेचे तलाठी भास्कर टुंबरे यांचे नियोजनाखाली घेण्यात आलेले हे शिबिर यशस्वी होण्यासाठी राजेंद्र मढवी, दिगंबर मोरे, प्रफुल्ल नागोटकर यांनी परिश्रम घेतले.



# रायगडातील विविध व्यावसायिकांसाठी पुरवठाविषयक कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पुरवठाविषयक बाबींसंदर्भात विविध व्यावसायिक, तालुका पुरवठा शाखेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची शुक्रवारी (दि. २५ मार्च) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेमध्ये उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र राम राठोड, अन्न व औषध प्रशासन विभागचे जिल्हा सहाय्यक आयुक्त लक्ष्मण दराडे, भारत पेट्रोलियम गॅस कंपनीचे मॅनेजर विशाल काबरा, आयओसी. कंपनीचे मणिकंदन मुरलीधरन यांनी मार्गदर्शन केले.

तर रायगड जिल्हा



रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे कार्याध्यक्ष शेखर देशमुख, पेट्रोल पंप धारक बाळकृष्ण पाटील, शिवभोजन केंद्र चालक जेधे, रास्त भाव धान्य दुकानदार सुधागड तालुकाध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, रास्त भाव धान्य दुकानदार कौस्तुभ जोशी, अच्युत आपटे व माणगाव पुरवठा निरिक्षण अधिकारी संजय माने यांनी मनोगत व्यक्त केले.

जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी पुरवठा विषयक बाबींचे मार्गदर्शन केले. तसेच आगामी काळात शासनाकडून सीएससी सेंटरच्या माध्यमातून राज्यातील रास्त भाव दुकानदार बँकांचे सर्व व्यवहार, रेल्वे विमान तिकिट बुकींग, सर्व प्रकारची बिले, शेतीविषयक सर्व सेवा, इन्कम टॅक्स रिटर्न भरणे, नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड, नावामध्ये दुरुस्ती अर्ज आदी सेवा देऊ शकतील, असे सांगितले.



# भाज्यांचे दर उतरल्याने गृहिणींमध्ये समाधान

## ▪ मिरचीचे दर मात्र अद्यापही चढेच

**कर्जत : प्रतिनिधी**

मार्चअखेर मिरची वगळता सर्वच भाज्यांचे दर कमी झाल्याने गृहिणींमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आधीच महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत असताना भाज्यांचे दरही चढे असल्याने नाराजी व्यक्त होत होती, मात्र आता भाज्यांचे दर घटल्याने सामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

मध्यंतरी भाज्यांचे भाव खूप वाढले होते. त्यामुळे दररोज भाजी करताना गृहिणींचे बजेट कोसळत होते. महागाईनेदखील उच्चांक गाठल्याने माध्यमवर्गीयांसह गरीब जनता मेटाकुटीस आली आहे. भाज्या,





मच्छी, चिकन, मटण सगळ्याचेच दर वाढल्याने आता खायचे तरी काय, असा प्रश्न सर्वांसमोर उभा ठाकला आहे, मात्र आता भाज्यांचे दर घटल्याने काही प्रमाणात सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे.

| भाजीचे दर (प्रति किलो) | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|
| टोमॅटो | ४० रु. | २० रु. |
| कोबी | ८० रु. | ४० रु. |
| फ्लॉवर | ८० रु. | ४० रु. |
| भोपळी मिरची | १६० रु. | १०० रु. |
| मटार | ४० रु. | ७० रु. |
| फरसबी | १०० रु. | ८० रु. |
| गाजर | ५० रु. | ४० रु. |
| भेंडी | ८० रु. | ४० रु. |
| वांगी | ८० रु. | ४० रु. |
| घेवडा | १२० रु. | ४० रु. |
| काकडी | ५० रु. | ४० रु. |

**गेल्या दोन महिन्यांत भाज्यांचे दर कडाडले होते. त्यामुळे कुटुंबाचे बजेट बिघडले होते. आता दर उतरल्यामुळे भाज्या खाण्याचे प्रमाण वाढले आहे. अन्य भाज्यांचे दर उतरलेत. मात्र मिरची खूपच तिखट झाली आहे.**
**–मीना प्रभावळकर, निवृत्त मुख्याध्यापिका**

**आम्ही नेहमीच भाज्या खात असल्याने दर कितीही वाढले तरी नाईलाजास्तव भाज्या विकत घ्याव्या लागतात. आता दर कमी झाल्याने थोडा दिलासा मिळाला आहे.**
**–संतोषी ओसवाल, गृहिणी**

# दिवेआगर किनारी कासव महोत्सव; पर्यटकांचा लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील निसर्गरम्य दिवेआगरच्या समुद्रकिनारी कासव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक पर्यटकांनी हजेरी लावून या कासव महोत्सवाचा आनंद लुटला.

वनविभाग रोहा, सह्याद्री निसर्ग मित्र चिपळूण व ग्रामपंचायत दिवेआगर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १५ ते २० वर्षांपासून सागरी कासव संरक्षण व संवर्धन सुरू असलेल्या कार्यक्रमांतर्गत यावर्षीही दिवेआगर समुद्रकिनारी कासव महोत्सवाचे आयोजन करून या उपक्रमात लोकांमध्ये जनजागृतीसाठी स्थानिक व पर्यटकांना सामावून घेण्यात आले.

समुद्री कासव संवर्धनासाठी दरवर्षी नोव्हेंबर ते मार्च महिन्याच्या काळात कासवाची मादी समुद्रकिनारी अंडी सोडण्यासाठी येतात. या वर्षीच्या हंगामात आजपर्यंत पाच घरट्यांमध्ये एकूण ६४७ अंडी मिळाली असून त्यांचे संवर्धन व संरक्षण वन विभाग, सह्याद्री निसर्गमित्र व दिवेआगर ग्रामपंचायत यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.



श्रीवर्धनचे वनक्षेत्रपाल मिलिंद राऊत, बोर्ली पंचतनचे वनपाल सुनिल गुरव, वनरक्षक दिनेश गिऱ्हाने, वनरक्षक शेख बुरान शेख इसा, कासव रखवालदार मंगेश पडवळ, संतोष गुरव यांनी मोलाची भूमिका पार पाडली.

या समुद्र कासव महोत्सवाप्रसंगी प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी व शेकडो पर्यटक उपस्थित होते.

# आयपीएलमध्ये कोलकाताची विजयी सलामी

## चेन्नईवर सहा गडी राखून मात ; अजिंक्य रहाणे चमकला

**मुंबई : प्रतिनिधी**

कोलकाता नाइट रायडर्स संघाने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या १५ व्या हंगामात विजयी सलामी दिली. त्यांनी शनिवारी (दि. २६) झालेल्या सामन्यात गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्जवर सहा गडी आणि नऊ चेंडू राखून सरशी साधत नवा कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वपर्वाचा विजयारंभ केला.



अनुभवी मुंबईकर सलामीवीर अजिंक्य रहाणेच्या (३४ चेंडूंत ४४ धावा) फलंदाजीच्या जोरावर कोलकाताने चेन्नईने दिलेले १३२ धावांचे आव्हान १८.३ षटकांत गाठले. तसेच या विजयासह कोलकाताने गेल्या वर्षी अंतिम सामन्यात झालेल्या पराभवाची परतफेडही केली. कोलकाताचे सलामीवीर रहाणे आणि वेंकटेश अय्यर (१६) यांनी डावाची उत्तम सुरुवात केली. त्यानंतर घरच्या मैदानावर खेळणाऱ्या रहाणेला नितीश राणाची (२१) साथ लाभली. रहाणेचे अर्धशतक सहा धावांनी हुकले, मात्र कर्णधार श्रेयस (नाबाद २०) आणि सॅम बिलिंग्स (२५) यांनी चांगली फलंदाजी करीत कोलकाताला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी चेन्नईने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १३१ अशी धावसंख्या उभारली. मागील हंगामात 'ऑरेंज कॅप' पटकावणारा सलामीवीर ऋतुराज गायकवाड खातेही न उघडता बाद झाला. तसेच न्यूझिलंडचा डावखुरा सलामीवीर डेव्हॉन कॉन्वेलाही (३) फार काळ खेळपट्टीवर टिकता आले नाही. या दोघांनाही वेगवान गोलंदाज उमेश यादवने पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

एका बाजूने फलंदाज बाद होत असताना दुसऱ्या बाजूने रॉबिन उथप्पाने आक्रमक शैलीत खेळताना २१ चेंडूंत २८ धावा फटकावल्या, मात्र फिरकीपटू वरूण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर डाव्या यष्टीबाहेरील चेंडूवर उथप्पाला शेल्डन जॅक्सनने अप्रतिमरीत्या यष्टीचित केले. अंबाती रायडू (१५) आणि मुंबईकर शिवम दुबे (३) हेसुद्धा अपयशी ठरल्याने चेन्नईची ५ बाद ६१ अशी स्थिती होती. त्यानंतर धोनी (३८ चेंडूंत नाबाद ५०) आणि कर्णधार रवींद्र जडेजा (२८ चेंडूंत नाबाद २६) यांनी चेन्नईला सावरले.

# मिस्टर युनिव्हर्स शरीरसौष्ठव स्पर्धेत अलिबागचे तीन बॉडीबिल्डर करणार भारताचे प्रतिनिधित्व

**अलिबाग : प्रतिनिधी**

सध्या अलिबाग तालुक्यातील अनेक तरुण-तरुणी आपले नाव सातासमुद्रपार घेऊन जात आहेत. त्यात आता तालुक्यातील तीन बॉडीबिल्डर्सची आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी निवड झाली असल्याने अलिबागकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पुणे येथे होणाऱ्या १५ ते १७ एप्रिलदरम्यान मिस्टर युनिव्हर्स या आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अलिबाग तालुक्यातील जयेंद्र मयेकर, ऋषिकेश म्हात्रे आणि दीपक राऊळ या तीन बॉडी बिल्डर्सना प्राप्त झाली आहे. तसे पत्र बॉडीबिल्डर अ‍ॅण्ड फिटनेस असोसिएशन रायगड ऑरगनायझर सेक्रेटरी-महाराष्ट्र बॉडीबिल्डींग असोसिएशन जनरल सेक्रेटरी दिनेश शेळके यांनी पाठविले आहे.

ग्रामीण भागात राहणारे व घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना केवळ इच्छाशक्तीच्या बळावर शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी स्वताला सिद्ध करीत जयेंद्र मयेकर यांनी चार वेळा मिस्टर इंडिया किताब पटकाविला असून एकदा मिस्टर आशिया किताबही



मिळविलेला आहे. आजपर्यंत त्यांनी विविध प्रकारचे २२ किताब पटकाविले आहेत. ते जिल्ह्यातील युवकांना शरीरशौष्ठव स्पर्धेसाठी तयार करण्याचे काम करीत आहेत.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, क्रीडा परिषद महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त बॉडीबिल्डर्स ऑण्ड फिटनेस असोसिएशन रायगड संलग्न महाराष्ट्र बॉडीबिल्डर्स असोसिएशन, इंडियन बॉडीबिल्डींग ऑण्ड फिटनेस फेडरेशनतर्फे मिस्टर युनिव्हर्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# ऑलिम्पिक पदक विजेत्यांचा बीसीसीआयकडून सत्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या सलामीच्या लढतीपूर्वी टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंचा



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वतीने (बीसीसीआय) सत्कार करण्यात आला.

सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राला एक कोटी रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारा तो केवळ दुसरा भारतीय क्रीडापटू ठरला होता. तसेच कांस्यपदक विजेती बॉक्सिंगपटू लवलिना बोरगोहेनला २५ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

टोकियो ऑलिम्पिकमधील ऐतिहासिक कांस्यपदक विजेत्या भारतीय पुरुष हॉकी संघाला एकत्रित एक कोटी रुपये देण्यात आले. या संघाचा कर्णधार मनप्रीत सिंगने बीसीसीआयचा अध्यक्ष सौरव गांगुलीच्या हस्ते धनादेश स्वीकारला.

या वेळी बीसीसीआयचे सचिव जय शाह, कोषाध्यक्ष अरुण धुमाळ, आयपीएलच्या प्रशासकीय समितीचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# आर्यन दिसला मिस्ट्री गर्लसोबत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) १५ व्या हंगामातील पहिल्या सामन्यादरम्यान बॉलीवूड अभिनेता शाहरूख खानचा मुलगा आर्यन खान उपस्थित होता. आर्यनचे एका मुलीसोबतचे काही फोटो व्हायरल होताना दिसत असून त्यांची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे.

आर्यन हा कोलकाता नाइट रायडर्सला प्रोत्साहन देतानाचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या फोटोत आर्यनसोबत एक सुंदर मुलगीही दिसत आहे. तिच्या आणि आर्यनच्या फोटोंची सध्या सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. ही मिस्ट्री गर्ल नेमकी कोण, असा प्रश्नही नेटकरी विचारत आहेत.

# भारतीय महिला संघाचे वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात

**क्राईस्टचर्च : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला वर्ल्डकपमध्ये मिताली राजच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाचे आव्हान संपुष्टात आले आहे. साखळी फेरीतील अखेरच्या करो वा मरो लढतीत भारताला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विजय गरजेचा होता. अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात टीम इंडियाला विजय मिळवता आला नाही. त्यांचा तीन विकेट्सनी पराभव झाला.

भारतीय गोलंदाजांनी द. आफ्रिकेच्या फलंदाजांना चांगलेच रोखले होते. त्यांना विजयासाठी अखेरच्या पाच षटकांत ४५ धावांची गरज होती. ४६व्या षटकात आफ्रिकेने पूजा वस्त्राकरच्या गोलंदाजीवर ११ धावा वसूल केल्या. त्यानंतर ४७ व्या षटकात गायकवाडच्या ओव्हरमध्ये १४ धावा गेल्या. गायकवाडने ४७ व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर विकेट मिळवली खरी, पण तोपर्यंत सामना आफ्रिकेच्या बाजूने झुकला होता. अखेरच्या १२ चेंडूंत त्यांना विजयासाठी १४ धावांची गरज होती, तर अखेरच्या षटकात सात धावा हव्या होत्या. त्यांनी त्या करून विजय मिळविला.

त्याआधी भारताने प्रथम फलंदाजी करीत ५० षटकांत ७ बाद २७४ धावा केल्या होत्या. भारताकडून सलामीवीर शफाली वर्मा (५३), स्मृती मंधाना (७१), मिताली राज (६८) आणि हरमनप्रीत कौर (४८) यांनी दमदार फलंदाजी केली.

भारताकडून स्मृती मंधानाने सर्वाधिक ६४ चेंडूंत सहा चौकार

### दक्षिण आफ्रिकेकडून पराभव



आणि एका षटकाराच्या मदतीने ७१ धावा केल्या. शफाली वर्मा ४६ चेंडूंत ५३ धावा करून धावबाद झाली. तिने आठ चौकार मारले. मिताली राजने ८४ चेंडूंत आठ चौकारांच्या मदतीने ६८ धावा केल्या. हरमनप्रीत कौर ५७ चेंडूत ४८ धावा करून बाद झाली. या खेळीत तिने चार चौकार मारले. गेल्या सामन्यात कमाल दाखवू शकलेल्या यस्तिका भाटिया (२) आणि पूजा वस्त्राकर (३) यांना मोठी खेळी करता आली नाही.

### एका नो बॉलने केला घात

भारताकडून अखेरचे षटक दीप्ती शर्माने टाकले. पहिल्या चेंडूवर एक धाव दिल्यानंतर दुसऱ्या चेंडूवर दुहेरी धाव घेण्याच्या प्रयत्नात भारताला विकेट मिळाली. तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर आफ्रिकेच्या फलंदाजांनी एक धाव घेतली. विजयासाठी आता दोन चेंडूंत तीन धावांची गरज होती. पाचव्या चेंडूवर दीप्तीने विकेट घेतली. यामुळे सामना पुन्हा भारताच्या बाजूने आला, पण अखेरचा चेंडू टाकताना दीप्तीने मोठी चूक केली. तिने टाकलेला सहावा चेंडू नो बॉल होता. त्यामुळे द. आफ्रिकेला फ्री हीट मिळाली. यावर त्यांनी एक धाव घेतली. अखेरच्या एक चेंडूवर एक धावा हवी होती आणि ती त्यांनी सहजपणे घेत विजय मिळवला.

# सर्वाधिक विकेट घेण्याच्या विक्रमाशी ड्वेन ब्राव्होची बरोबरी




**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलमध्ये पहिल्या लढतीत कोलकाता नाईट रायडर्सने चेन्नई सुपर किंग्जचा पराभव केला असला तरी संघातील जलद गोलंदाज ड्वेन ब्राव्होने एक मोठा विक्रम केला आहे. त्याने आयपीएलमधील सर्वाधिक विकेट घेण्याच्या विक्रमाशी बरोबरी केली.

३८ वर्षीय ब्रावोने कोलकाताविरुद्धच्या सामन्यात चार षटकांत २० धावा देत तीन विकेट घेतल्या. त्याने वेंकटेश अय्यर, नितिश राणा आणि सॅम बिलिंग्स यांना बाद केले. बिलिंग्सला बाद करताच ब्रावोच्या नावावर आयपीएलमधील सर्वाधिक विकेट घेण्याचा विक्रम जमा झाला. याबाबत त्याने मुंबई इंडियन्सचा माजी जलद गोलंदाज लसित मलिंगाच्या विक्रमाशी बरोबरी केली. या दोघांनी प्रत्येकी १७० विकेट घेतल्या आहेत.

आयपीएल २००८ मध्ये मुंबई इंडियन्सकडून पदार्पण करणाऱ्या ब्रावोने १५२ सामन्यात २४.०१च्या सरासरीने आणि १७.२८ च्या स्ट्राइक रेट १७० विकेट घेतल्या आहेत. २२ धावा देत चार विकेट ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. पहिल्या तीन हंगामांत मुंबईकडून खेळणारा ब्रावो त्यानंतर चेन्नई संघाशी जोडला गेला. २०१६ मध्ये तो गुजरात लायन्सकडून खेळत होता. २०१३ आणि २०१५ साली त्याने पर्पल कॅप जिंकली होती. आता पुढील सामन्यात ब्राव्होला मलिंगाचा विक्रम मागे टाकण्याची संधी आहे.

# शेल्डन जॅक्सनच्या यष्टीरक्षणाची सचिन तेंडुलकरने केली वाहवा



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा १५ व्या हंगामाला सुरुवात झाली असून पहिल्याच सामन्यात केकेआरने दणदणीत विजय मिळवला आहे. गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्जला पहिल्याच सामन्यात पराभव स्वीकारावा लागलाय. या सामन्यात केकेआरच्या सर्वच खेळाडूंनी धडाकेबाज कामगिरी करीत विजयाला गवसणी घातली. दरम्यान केकेआरचा यष्टीरक्षक शेल्डन जॅक्सनची सर्वत्र वाहवा होत आहे. रॉबिन उथप्पाला बाद करण्यासाठी त्याने केलेल्या स्टंम्पिंगची दखल थेट मास्टर ब्लास्टर सचिनने घेतली आहे.


प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या चेन्नईचा एकही खेळाडू खेळपट्टीवर तग धरू शकला नाही. ऋतुराज गायकवाड तर शून्यावर बाद झाला. त्यानंतर डेव्हॉन कॉन्वेच्या रूपात चेन्नईला २८ धावांवर दुसरा झटका बसला. रॉबिन उथप्पाने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र लय सापडण्याआधीच उथप्पा वरुण चक्रवर्तीने फेकलेल्या चेंडूमुळे गोंधळला आणि यष्टीक्षक शेल्डन जॅक्सनने कशाचाही विलंब न करता विद्युतवेगाने उथप्पाला बाद केले. त्याची हीच कामगिरी सध्या चर्चेचा विषय ठरतेय.

# महेंद्रसिंह धोनीने दिग्गजांना टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १५ व्या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात पहिला सामना रंगला. या रोमहर्षक लढतीमध्ये चेन्नईच्या फलंदाजांनी निराशाजनक कामिगिरी केली, परंतु माही अर्थात महेंद्रसिंह धोनीने आयपीएलमध्ये एक नवा इतिहास रचला आहे. धोनी आयपीएलमध्ये अर्धशतक करणारा सर्वांत जास्त वय असलेला भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे.

धोनीने वयाच्या ४० वर्षे २६२ दिवसांत आयपीएलमध्ये अर्धशतक ठोकले. त्याच्या आधी हा विक्रम राहुल द्रविडच्या नावावर होता. द्रविडने २०१३ मध्ये आयपीएलमध्ये शेवटचे



अर्धशतक झळकावले होते. तेव्हा त्याचे वय ४० वर्षे ११६ दिवस होते. धोनी आयपीएलमध्ये अर्धशतक करणारा जगातील तिसरा सर्वांत वयस्कर फलंदाज आहे. यामध्ये ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार अ‍ॅडम गिलख्रिस्ट आघाडीवर आहे. गिलख्रिस्टने २०१३ मध्ये शेवटचे आयपीएल अर्धशतक झळकावले होते. त्या वेळी त्याचे वय ४१ वर्षे १८१ दिवस होते, तर ख्रिस गेल दुसऱ्या क्रमांकावर आहे. गेलने २०२० साली आयपीएलमध्ये शेवटचे अर्धशतक केले होते. तेव्हा त्याचे वय ४१ वर्षे ३९ दिवस होते.

दुसरीकडे धोनीने शिखर धवनचा आयपीएलमध्ये सर्वाधिक नाबाद ५० हून अधिक धावांचा विक्रम मोडला. धोनीने आयपीएलमध्ये २०व्यांदा नाबाद ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या. धवनने आयपीएलमध्ये १९ वेळा अशी कामगिरी केली आहे. या बाबतीत दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स आघाडीवर आहे. डिव्हिलियर्सने आयपीएल कारकिर्दीत २३ वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावांची नाबाद खेळी खेळली आहे.



पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त किंग्ज इलेव्हन संघाच्या वतीने नवीन पनवेल येथील बांठिया शाळेच्या मैदानावर महामानव चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवानेते विश्वजीत पाटील यांनी भेट दिली. आयोजकांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com